# असंग्रहित कविता

## अजन्म

-- चं.प्र.देशपांडे

कितीदा तरी सांगितलं मी माझ्या प्रश्नाला
तू फक्त अनेकांतला एक आहेस --
सालं सोलली तर संपायची नाहीत -- प्रत्येक
साल सालं चिकट अडकलेलं
तू माझा आहेस म्हणून महत्त्व मला --
मला सोडवायला हवंय -- मीच
-- थोरांचे शब्द मला समजलेले का नाहीत --
की तेही माझे प्रश्न -- एकेक --
मनात आणलं तर मीही कल्पीन मूलप्रश्न
नाळेइतक्याच क्षणात ...

प्रत्येकजण घेतो ऐकून -- म्हणतो हो -- उचलतो
वजन -- पण उभाच राहतो
घामाचा थेंब पडला तर मृण्मय पृष्ठभागावर
ओला खड्डा पडतो -- शुष्क
त्वचेवरच्या वाऱ्यानं प्रश्नांसारखे केस गार
होतात -- वाटतं विसरल्यासारखं
पण पुटं चढली की सालं होतातच -- हाही एक
प्रश्नच साला -- पण मूलप्रश्न म्हणतात तो हाच --
असावासं वाटतं समाधान -- विधानं खूप सुचतात
-- मग वाटतं साली प्रोसेस निधन पावली --
वैताग -- थोर पण दुष्टच साले -- ... हेच ...
हे वाईट...हे एवढं...प्रयत्नांती...

लोकांशी बोलतो -- आपण काय -- ' तेथे लव्हाळे वाचती ' --
विनम्र होऊन वाचतो सगळे मिळून
मिसळून राहावं एकमेकांशी ... तर कपडे पण
साले सारखे असू नयेत ... हूं ...
सैन्यासारखे खूप आदर्श खडे होतात ...
तैय्यार -- ते आम्ही पुरात टाकीत राहतो ...
-- चर्चेनंतर कसं गुंग वाटतं -- कसं शांत
अर्धोन्मीलित वाटतं -- प्रौढ --
वाटतं थोर उगीच नाही झाले -- किती क्षुद्र
आहोत साले आपण -- कळलं पाहिजे --
सालं कॉमन इंटरेस्ट असलं म्हणजे बरं असतं
-- पुरात वाचतो तोच शहाणा नव्हे का --
खूप दया येते -- वाटतं काय हे -- फुकट --
निदान आपली प्रोसेस तरी चालू आहे ...

खमीससुध्दा टरकतो -- मग सरळ दोन हात --
दातांच्या पकडीत वेळेची जीभ
रेल्वे लाईनवर मग सगळं लेट -- पेट भरना
है -- तत्त्वज्ञान बोलतोय साला
पोर्टरच्या तांबड्या शर्टवर रक्ताची गुळणी
केली तरी दिसत नाही -- सगळंच डेंजर ...
जनतेला गर्दी हवी -- नाहीतर रोजगार पण
डळमळीत -- सिग्नल तर पडलाय ...
पडल्या पडल्या खमीस शिवून टाकावा साला
-- उगीच पडल्याची आठवण नको ...
कितीदा तरी सांगितलं -- घेतो ऐकून --
म्हणतो हो -- उचलतो वजन -- पण उभाच राहतो...

उभ्या उभ्या दोन चांगले शब्द बोलावे -- पुढं व्हावं --
माणसामाणसांतली नाती आहेत ही --
आजोबांच्या पांढऱ्या केसांत कितीतरी नात्यांची
धूळ -- ते म्हणतात सर्वोपयोगी
आमचे तसे अजून काळेच -- पांढरे झाले
तरी या आठवणी कशा बुजणार --
त्याही पांढऱ्या होतात -- आजोबा अजबच --
अनुभवाचे बोल ऐकावे --
बोल लावायचा तर स्वतःला -- नाहीतर दुसऱ्याला
-- इथंसुध्दा इतकीच पॉसिबिलिटी
सगळीच शंका यायला लागते -- वाटतं कॉमन
इंटरेस्ट असून तसा उपयोग नाही ...
म्हणजे तसं वेगवेगळं -- की मिळून -- की एकच
-- की बंडल -- की स्वप्न -- असं ...

धडधडीत खोटं बोलणारी असतात बरीच
माणसं -- स्वतःलासुध्दा खरं वाटेल इतकं
मेंदूला भेग पडण्यापूर्वी संपावं लागतं -- म्हणजे
खोटंसुध्दा वाचून संपतं
जगलो वाचलो म्हातारा होईपर्यंत तर
बऱ्याच प्रश्नांतून सुटायला हवं तोवर
पण सालं मूलकूट सुटेल का -- नाहीतर
वेगळं पुन्हा तेच -- केसभरून
प्रवासात निदान चांगली साथ तरी हवी --
पण मधेच सुटली तर --
मग साला पुन्हा प्रश्न -- पुन्हा सालं --
वाटतं जाने दो -- पण काळेच ना अजून
एकही चांदणी नसताना वर कुट्ट अंधारात
पाह्यचं -- फाटल्यासारखी भीती वाटते
पळून गेलं तरी साले पाय चिकटलेलेच
-- हे ठीक -- पृथ्वीची तरी साथ सुटू नये
नवग्रहांवर जाऊन आलो तरी आपली साथ

आपल्याला हवीच -- संथ व्हावं फार तर
संथ होत गेलेला माणूसच संत होत असला पाहिजे
-- मग अशाचे शब्द थोर -- प्रमाण --
अंतर किती आहे ते माहीत हवं -- म्हणजे तेवढी
शाश्वती -- हे काय सालं -- कूट
ऊठसूट खरंखोटं पाहावं तरी कठीणच --
मौनसुध्दा भरून येतं -- वाकडंतिकडं

येताजाता मरणाची आठवण बरी की वाईट --
प्रत्येकाला प्रेयसी असतेच -- कधी प्रेमळ
कमळांचा जन्म तिथूनच व्हावा लागावा -- ही
मात्र भोगाइतकीच सुखद जाण
ऊक्तानूक्त बोलांची नजरेइतकीच -- तिरंदाज --
श्वापदासारखी चौखूर शान
पूर्वतयारीत हालचालींना येणारे अतीच्छित अर्थ
कसे भरभरून -- दुथडी
अशा बऱ्याच घटना -- थोडा फार फरक --
अर्थाची इच्छा आपली -- कॉमन
मरणासाठी काही अडून राहात नाही -- हे ठीक --
आठवणींची तरी सोय होत जाते

काही काही माणसं खूप लांबून येतात --
परकी वाटतात -- तशीच असून -- कोण जाणे
ते त्यांच्या हातात नसतं -- स्वतःचं स्वतःच्या
वागणं -- बोलणं -- कपडे -- न्यून वा जादा
संबंधांना फक्त माणूस या जमातीसाठी अर्थ
तेही लांबच -- उगीचच भांडणासारखे
तसं म्हटलं तर सगळेच -- वेगळेच -- काही
बगळे काही कावळे -- ओवळे वा सोवळे
प्रत्येकाची काही ना काही बाजू -- कधी मिळती --
मग संघ -- पाहिले -- दुसरे -- तिसरे ...
हसरे काही लाजरे -- कठोर काही उजाड
चेहऱ्यांवर डोळे जडवलेले -- हलते
स्वतःकडे पाहिलं तरी बरंचसं नजरेआड
-- पडद्याच्या मागून हालचाली -- स्वतः
हललं तरी वाटतं तिथेच आहोत -- तिथेच असलो तरी
वाटतं हललो आहोत -- उगीचच हरल्यासारखं वाटतं
काहीतरी ओघळत गेल्यासारखं जाणवतं
स्वतःतूनच -- कीव -- संथपणे --
माणसांत मिसळलं तरी -- कुठल्याही -- तसंच
परकं वाटत राहतं -- विश्वास वा अविश्वासातून
पक्षी हलले तरी रंगच वाटतात नुसते
पोकळ -- उबळीसारख्या श्वासोच्छ्वासातून

प्रश्नाकडे बघत बसायचाच एक खेळ होतो -- सवयीचा

वाटतं -- बरंय -- संपेलच अंतर कधी ना कधी
जगायचं तर अन्न हवं -- वस्त्र हवं -- निवारा
चार मानाच्या शब्दांचा हवा -- रोजगार
सालं अडाण्यासारखं मुंडासं फडकवीत
वर्षानुवर्ष मेहनतीत -- हे हराम
वैतागानं पाहिलं तरी स्थिती तीच -- फक्त समाधान
तेवढंच कुठंतरी फुटल्याचं -- मनापासून
प्रत्येक गोष्टीला कुठंतरी स्थान हवंच -- सालं
सगळी मिळून प्रोसेसच एक

बघतो -- आत जातो -- तिथं एक प्रतिमा -- प्रत्येक वेळी
तीच बघायला लागते प्रश्नाकडे --
म्हणजे मीच प्रश्न ताब्यात घेतो -- आपलाच
तो -- तो आणि मी -- असं त्रांगडं
म्हणजे आम्ही सगळेच असतो -- एकमेक --
कधी वाटतं आम्ही खूपच कमी आहोत
तिला वाटत असतं आपण पोचणार -- आहोत --
उद्याच्या प्रश्नाचे संथ काळ
पण प्रश्न -- ती -- आणि मी -- इच्छित स्थान
अंतिम -- सगळे मिळून -- पुन्हा होतो -- कूट
तिचा दृष्टिकोण व्यक्तीव्यक्तीगणिक बदलतो
प्रत्येक प्रश्न आपलं व्यक्तित्व दडवतो --
तिला फक्त नष्ट व्हायचं नसतं -- मला
फक्त प्रश्न -- हे कूटच -- मलाच सोडवायला हवं ...

शरीरधर्म तसा बिबोभाट -- मनाहून वेगळा
मधे बरीच फुट -- हा वैताग
दोघांच्याही हालचाली परस्परांशी विसंगत
सगळा ताल सुटलेला मेळा
बोललं तर क्वचितच स्वतःला ऐकू येतं
रंगांपेक्षा आठवणींना महत्त्व
शारीरिक सातत्यासारखं प्रतिमेचं -- हट्ट
उदासीनतेहून अधिक सवयीचा
आकृतीमधे अनेक गुंफलेले हात -- पाय -- नाक
मधेच प्रतिमेचं -- घडलेलं रूप

थोर म्हणतात भांडू नका -- संगतीनं भरून
गुणानं रहा -- पण साले हे आमचे गुण --
विचार केला तर खूप असतं -- एकातून एक
करतोच -- शरीरसंपर्कासारखा
खरंखोटं कोण जाणे -- हेही कदाचित
शब्दच असतील -- रिपीटेड नुसते

शिक्षणात घालतो कित्येक वर्षं -- हे जनरल
बरंच -- ज्ञान ज्ञान ज्ञान

साली आपली तंगडी वर पाहिजे -- कुठंही
   राजकारणात त्याचा उपयोग होतो -- खाजगीही
तडातड फेकल्यावर दिपून जातात साले लोक
   मेंदू वाढत जातो -- भाव पण --
चिंतन मनन पण काय आनंदशीर --
   क्रोधसुध्दा रेफरन्स बुकातला
स्वदेश परदेश साले सगळे टोपीखाली
   यासाठी तरी जगावं सालं -- सदुपयोग
घ्यावं घ्यावं घ्यावं -- अनुभव -- बायका -- पाय
   खूप लांब जायला हवं
या सगळ्यात आपण असतोच -- काया -- मन --
   वाचा पण बसत नाही
सगळे अवयव जमवत अडकवत जायचं
   कित्येक शरीरांइतकी ताकत हवी

विचार केला की -- आपण कसेही असो -- खूप
   आदर्श खडे होतात साले -- सैन्यासारखे
प्रश्नसुध्दा किती दिसून येतात -- एरवी
   न सुचणारे -- काठोकाठ उकळत
मग सारखं बजावावं लागतं -- महत्त्व
   मला -- प्रश्नांना नाही -- पुन्हा
तेवढं सुटलं की आपण थोर -- हे बरं
   घाम आला तरी -- थकावट
खमीस फाटलेला असो -- केस काळे असोत
   लव्हाळे वा आपण -- खडे वा पूर
नाळ तुटल्यापासून याला सुरुवात होते
   पण साला आपला जन्म कधी होतच नाही

( १९६३ )

--o--o--o--

## कदाचित डोळस

-- चं.प्र.देशपांडे

तू कोण आहेस मला निश्चित ठाऊक नाही
कळलंय तेच कदाचित खरं असेल
तू आहेस हे मात्र स्वीकारायला हवंय मला
यात माझं महत्त्व मुळीच नाहीय
भाग आहे मी माझ्या शरीराचा
शक्याशक्यतेचे विचार टाकतोय मी आता
पूर्ण शरण आलोय
क्षमा मागतोय मी
मी एक अपराधी
एक क्षुद्र क्षुद्रत्व
अभद्रकर्मकर्ता
पुरता भोगलाय मी क्रोध
आता फक्त नम्र डोळे उरलेत
सगळ्या सोहळ्यांचा त्याग करायला तयार आहे मी
उरलीसुरली कारणंही फिकी पडताहेत
उरल्यासुरल्या चिंताही क्षीण होताहेत
फुटण्यापूर्वी लाटा आवरायला हव्यायस तू
नाहीतर आहेच मी क्रियापदाचं अखंड कर्म
खंड जे आहेत तेही खोटेच वाटतायत त्यात नसताना
अप्रामाणिकपणा असेल असं वाटतं मधेच हा
तेही मला आता कळत नाहीय निश्चित
आता तू कोण आहेस कुठं आहेस माहीत नाही
वासरूच आहेस असं समजू का नवजात वा प्रौढत्वपूर्व
माणसाला लाजही वाटू नये खरं म्हणजे
क्षमा मागताना कोण्या एका गोंडस तत्त्वाची
जे होतं वा नव्हतं असेल वा नसेल
उरलेलं अर्धही खरं मानायला हरकत नसावी
नरकयातनांत पुन्हापुन्हा अर्धमेल्या होणाऱ्या
एका कःपदार्थ अहंकाराची
सत्य हे सुंदर असतंच असं म्हणतात
शिवाला मी शरण आहे
शमन ठरेल का हे तुझं
यातही स्वार्थ आहे माझा
शरीराचा भाग असेपर्यत मलाही स्वीकारायला हवंयस तू
कित्येकदा कावरेबावरे होतात माझे डोळे अजून
कुठल्यातरी सहजान्वित योजनेचा भाग असेल हा
खरं वाटायला लागलंय हे आता
ही अनिश्चितता हेच माझ्या बुध्दीचं मळभ
तुझ्यासमोर उघडा पडतोय मी आता अंतर्बाह्य
दिसतील तुला व्रण असतील ते सगळे
संतापेन बहुधा मीही उपाय कोणी चोरला तर
शरीर असेपर्यंत मी माझं

तूही तेव्हा शरीरच असावंस फक्त
शरीरंच फक्त वार करतात
असं कधीतरी जाणवलंय पुसटसं
मळभ हरायला तयार व्हायचं नाही कदाचित
फक्त आता याचना उरलीय
तुझं देणं फिटण्याआधी
परागंदा होण्याची परवानगी हवीय मला
तुला मृत्यूमुखी ढकलून
सजीव जीवन जगायला देणगी मागतोय मी
हलाहलात तडफडत ठेवून हसत गेलो होतो मी
कोंडमारा दडवीत कदाचित स्वतःपासूनच
विश्वभर उडालेले अंगार चुकले नाहीत आपली दिशा
त्या अंगारांखालीच फुलवले असतील मी तेव्हाचे दिवस
भाजू लागण्यापूर्वी या बरसातीत
स्वतःचीच कीव करीत आलो कळू लागल्यापासून
त्यातूनच कधीतरी धरू लागलो कुठल्यातरी मंगल दिशेची कास
विलग होत नष्टही झालो कधीकधी शरीरापासून
आयुष्याचा अर्थ विचारणं सोडून दिलं तेव्हापासून
मळभानं तरीही असता असता आपला भीतीधर्म कायम ठेवला
याचना ही त्याचीच आहे
ओळखूनही करतोय असं म्हणणारा मी
पुन्हा एकदा फसवणुकीचा प्रयत्न
पूर्वापार स्वभावाचं पुनर्प्रदर्शन
प्रामाणिकपणाच्या समंजस बुरख्याखालून
हेही खोलून दाखवायला नकोय तुला
कारण तू मला केव्हापासूनच ओळखून आहेस
तेव्हा अज्ञ होतो आत्ताही नाहीय असं नाहीच
क्वचित कुठेकुठेच फक्त पुसल्या जाणाऱ्या दुर्दम्य रेषेसारखा
कदाचित हे तुला माहीतही नसेल
कदाचित हे सगळं तुझ्यापर्यंत पोचणारही नाही
केवळ शंका असल्या थांबवू शकणार नाहीत आता ही ओकारी
हा सगळा चिकट द्रव तुला अर्पण करायची इच्छा आहे माझी
तो तुला पोचलाय असं गृहीत धरून मूल्यासारखा
गिऱ्हाईकासारखा मालाची अपेक्षा करीत बसणार आहे मी
व्यवहारी हक्कासारखी निगरगट्टपणे
हीच एक व्यवहार्यता उरलीय आता असं गृहीत धरून
प्रत्येकाच्या तीरात प्रत्येकजण असतोच
तसा तूही असणारच
नुसता युक्तीवाद ठरू नये हा अशीही एक इच्छा
त्या एका इच्छेचा भाग असलेल्या अशा कितीतरी
ती माझा म्हणजे या लक्ष्याचा भाग
भेदून गेले आहेत बरेचसे त्यातले वेगासकट
आवरू शकणारच नाहीस का त्यांच्यातला तू त्यांना
कदाचित ते कोमल तत्त्व नसशील तू आता
एका फुलण्यापूर्वीच संपलेल्या कळ्याची वेदना

खूप दूर गेला असशील तू तिच्याहीपासून
तसाच मीही आलोय त्या माझ्यापासून
तेव्हा तू फुलपाखराची स्वप्नं पाहात असशील
वाट पाहात असशील
त्याच वाटेंवरून अमानुष पावलं आडवीतिडवी धावली माझी
तुझ्याबरोबरच तुझ्या वाटेवरच्या सगळ्या पाखरांना ठार करीत
माझे दिवस तरी तेव्हा फुलले की नाही आठवत नाही
आजचा मी हा तेव्हाचा तो आहे हे मात्र मान्य करतोय मी आता
तसं नसण्याची शक्यता असली तरी सत्य असण्याची शक्यता असलेल्या
एका निरागस करुणतेपुढे लोटांगण घातल्याच्या समाधानासाठी
हे समाधान जरी हळूहळू खरं ठरत गेलं
तरी कदाचित् सुस्नात होईल हे शरीर
मरणांनंतर वैरं नष्ट व्हावी
हे जर खरं असेल तर जिवंतपणीच
स्वच्छदृष्टिस्नान अशक्य नाहीय मला
असतील तर तिन्हीत्रिकाळ सगळीच खरी असतील
होईनही मी पक्षी कदाचित
एका तथाकथित हत्याभीरूचं दिवेलागणीपूर्वी
अन्नग्रहण करावं लागण्याचा शाप मिळालेल्या जीवाचं
एक उडतं रूप
याच देही घ्यावी म्हणतोय दृष्टिझेप
स्वतःतील तीघांनाही नष्ट करून
हीही एक प्रदर्शनरूपी अमरत्वाभिलाषा असेल का
मर्त्यपणच येईल तसं असेल तर एवढं जाणलंय मी
विस्मृतीचा उपयोग जगण्यासाठी होत असावा  वर्तमान रूप
त्रिकालदर्शी आरशानं एका तरीही दाखवले आहेत
मागच्यापुढच्या बिंबांचे संबंधित प्रस्तुत भाग
अजूनही अज्ञातच वाटणारं तुझं बिंब
स्वतःचंच बिंग फुटल्यासारखा फुटक्या भिंगातून पाहतोय मी
विचार क्रिया प्रतिक्रिया वगैरेंचं माझ्या
कर्तृत्व बहाल करून घेतलेल्या सहचारिणीतून
अशाच सहचर भेगा प्रक्षेपण वा ग्रहण करतात
बऱ्यावाईट गोष्टींचं ज्यांतून सुटका अशक्य असते
असं वाटतंय निदान शारीर स्तरावरतरी
प्रयत्नात तरी निदान असेनच मी तसं वाटून घेण्याच्या
तसा जाणवतोसही तू कधीकधी स्वतःत
-- निदान असे संबंध जोडावेसे वाटताहेत कळल्यापासून --
रुतून बसलेला माझ्यात खोलवर
स्वतःतल्या इच्छाआकांक्षावासनांनिशी
या शरीरानं चालवीत पुढे तुझी स्थिती
हे बिनमहत्त्वाचं ठरावंसं वाटतंय मला
दोघांच्याही दृष्टींनी
तुझ्या तेव्हाच्या क्रुध्द दृष्टीचा सुरा हा असा अपरिहार्यच असला
खुपसलेला सतत बंबाळ मधूनमधून जाण देत
एकरूपच झाला असेल जर तो या शरीराशी त्याचा एक अटळ भाग म्हणून

तुझाही नाईलाज आहे तसं असल्यास
मी माझ्यातल्या तुला विनवतोय आता
तुझ्या वारांनी वाळल्यासारखा तडे जाणारा मी
एक रक्तपिपासू रक्तलांछित मुमुक्षू
माझ्याआधी नष्ट होण्यासाठी विनवतोय मी तुला
हीही शिक्षाच आहे एक औपरोधिक विरुध्द समांतरता
प्रार्थना करतोय मी जणू तुझ्या मुक्तीसाठी
माझ्या पंखांआधी तुझीच झेप विरल विलीन व्हावी म्हणून
माझं दुर्बल हितचिंतकत्व
बहाल करतोय मी तुला पण माझ्याचसाठी
त्याचा स्वीकार करून नष्ट हो तू माझ्यासाठी
आपल्या इतक्या सहवासानंतर एकमेकांत मिसळल्यासारख्या
दुसऱ्या स्वरूपाच्या सुखासाठी केवळ
स्वतः करायला अशक्य आहे मी हे
माझाच अधिकार मानलाय मी माझ्यावर
आहेही मीच हा बहुतेक तेव्हाचा तो
तेव्हाच्या त्या बहुतेक तुला म्हणूनच ही कदाचित विनंती
आगंतूक म्हणण्याचा प्रश्नच नाहीय तुला
मीच तुला खुपसून घेतलंय स्वतःत जणू आत्मनाशातून
तुझ्या नाशातूनच जणू ही दुःचरितमेढ रोवलीय मी स्वतःत
त्या मेढीतलं तुझं अस्तित्व आता मागं घ्यायला हवंयस तू
तुझ्यासमोरच वा तू असतानाही मीत प्रार्थितोय मी
त्या पवित्र शक्तीला सहजकारी
विनाशातूनच एका वेगळ्या रूपानं निर्मितीकारणही असणाऱ्या
नष्ट कर या माझ्या सहचराला
सामावून टाक त्याला त्या एका अखंड प्रक्रियेत
इतक्या उघडपणे अपमान करतोय तिचाही
तिच्यावरच अतिक्रमण केलं होतं मी तेव्हा
त्याच्याच परिणामातून हे दुसरं औध्दत्य पत्करतोय
यात फक्त दुबळं स्वममत्वच आहे आता
हे अज्ञानही असेल किंवा पांघरलेलं
स्वतःपासूनही लपवण्यासाठी एक घमेंडी आक्रमकत्व
समांतरच असणारं कदाचित पूर्वस्वरूपाला
आता काहीही असलं तरी खरं वा खोटं
केवळ या प्रार्थनेखातर सोडवायला हवंयस तू मला
तुला योजतोय मी जणू माझ्या हेतूपूर्तीसाठी
माझ्या निर्लज्जपणाची ही बहुधा कमाल मर्यादा असावी
तुझ्या उपमर्दासाठीही तुझीच मदत लागेल मला आता
हे ओळखून तीही मागण्याच्या प्रयत्नात आहे मी
मी खरोखरच मागतोय की नाही हेही बघू नकोस
मृत्यूलाही अग्नी देणाऱ्या त्या शांततेतून
माझ्या या मित्रशत्रूवर ते अंतिम शांततास्त्र सोड
माझ्यातील जखमेच्या खड्ड्यातच दफन कर त्याचं
ज्वालाग्राही मृत्यूसारखीच शांतता पसरू दे तीवर
त्या शांततेला माझीही राख फासता येईल कदाचित पुढेमागे

उपकारक ठरावं एवढ्यासाठी म्हणून तरी दृष्टी दे
फक्त एक क्षेप करू शकेल कदाचित दोघांना झेपमुक्त
रूपातून झेप झेपेतून अरूप तू
तुझ्या आठवणीच्या मार्गावरूनच चालतोय मी
कधी तू कधी मी असा एक धूड
खरंच या अंकुशाची अजून जरूर वाटतेय का तुला
मी म्हणजे मी नव्हे म्हणजे अपात्र नाही एवढं पाहिलंय मी कधी कधी
आता मागंही फिरता येईलसं वाटत नाही
खरंच
असेलही कदाचित तुला दिसत त्या धुडाखाली मी चेंगरण्याची शक्यता
माझ्या नष्टतेबद्दल मीच बोलणं तसा खोटेपणाच
तो करायची तयारी नसती तर प्रार्थना कशी शक्य झाली असती
तीही पुन्हा कशातरीबद्दल वा कुणाचीतरीच करता येते
शक्तित्व ते कुठल्यातरी रूपात वा कल्पनेत साठवून
पातळ्या निर्माण होतात त्या इथून
ऐहिकता भौतिकता ही अशी कार्यप्रवण
या पातळ्यांतील कुठलीतरी एक स्वीकारून
तिच्या अंतिम स्वरूपाच्या एकरूपत्व शक्तीची आराधना
तशीही करावी वाटतेय आता अर्थातच हेतूपूर्वक
भय आदर अशा स्वक्षुद्रत्व असहायतेतून जणू
तुझी आणि त्या स्वरूपाची
तुम्हा दोघांच्या शक्यतांप्रमाणेच माझीही शक्यता अफवा असेल
या अफवांच्या थव्यांचे हे व्यवहार आहेत
प्रेमाचार सदाचार यांच्या या मर्यादाच असतील
कदाचित तेच सगळ्या मर्यादांचा अंत असतील
तत्पूर्वावस्था आहेत या निदान असं वाटतंय
दोघांच्याही वा तिघांच्याही वा अशा आपल्यांतील अनेकांच्याही
फक्त आसक्त क्रियाच संभवतात अशांतून
विरक्तीही तशीच घट्ट एक प्रतिक्रियाकारिका
कशातूनही तू दूर हो माझ्यातून
विलीन झाला असशील नसशील तू
हे स्वरूप तरी नष्ट हो
माझं ते स्वरूप नष्ट झालोय निदान वाटतंय असं
प्रार्थितो मी त्यासाठी तरी निदान त्या पातळीला
सोय अशी नैसर्गिक विस्मृती तरी आहेच
तशीच तुलाही असेल म्हणून फक्त क्षेपाचीच क्षमा मागतोय मी
याउप्पर कशालाच आक्षेप घेण्याची ताकत नाहीय माझी
एवढं पातळी आणि क्रुध्दास्त्र या दोन्ही क्षेपांना सांगून मोकळा होताय मी
मी एक स्वार्थी क्षेपणास्त्री मानव
यथाकथित संदर्भातील
श्रध्देसंदर्भातील
कदाचित अंधश्रध्द होण्याच्या प्रयत्नात आहेसा वाटणारा
एक कदाचित डोळस ...

-o-o-

( -- अभिरुची, जुलै १९६७ )

# वही क्र.६

## डूल

दाराच्या काचेआड फूल
फुलाजवळ डूल
डुलाजवळ एक हलती बट
जी सारखी मधूनमधून डोळ्यांजवळ ...

-0-0-

## कोर

हळूहळू उगवते कोर
मी असा समोर स्तब्ध उभा
सरकत सरकत विलग होत
विकसत जातं आकाश
संथ संथ प्रकाश
शांतवत
अन् पानांचे पिसारे
मरणातीत ...

-0-0-

## स्पष्ट असा

पिवळेजर्द नितळफेक
घोटीव रेघट डोळे
अंग काळं फुलता
प्रकाश पाठीवर ... संध्याकाळ,
निर्जन, तुरळक झुडुप, असं मांजर ...

नुक्त्याच बांधून पूर्ण
झालेल्या इमारतीचा
घोटीव वास सावकाश,
स्वच्छ, मंद, चेतक -- फुटकळ
सामानापासून अलिप्त असणारा

एक स्वयंपूर्ण स्पष्ट
असा अंतर्बाह्य एकांत ...

-0-0-

## सामर्थ्य

... हळूहळू एकेक अक्षर अनोळखी
हळूहळू एकेक शब्द वाफेसारखा विरत
सकाळी उठताच
व्याकरणही हरवलेलं
एक अस्ताव्यस्त आवाजांचा प्रचंड हत्ती
अन् मी एक वादळात भरकटणारं तारू
-- असं होणार नाही केवळ
या विश्वासावर कविता लिहितोय

कवितेच्या अभावाच्या कल्पनेच्या
भीतीचं अस्तित्व
हे निदान माझ्यापुरतं तरी मी
जिरवू शकतो माझ्या मूकतेत ...

भीतीची निर्मिती
हे माझ्या शब्दांचं सामर्थ्य
तिचा नाश
हे माझ्या निःशब्दतेचं ...
-0-0-

## लय

तिच्या मांड्यांच्या लयीवर
या विश्वाचा विनाश ...
एक क्लिष्ट असंख्यताच
शेवटी ...
तसे शेवटी काहीही असो
पण एक भरीव
भरारतं भविष्य
हे हवंच ... विनाशासाठी.

-0-0-

## पडदा

अंधाराचा पडदा
त्यावर हलक्याशा सावल्या
हळूहळू फेडत जातात
विस्फारत अंतर्भाग
गर बिया समूह
समुद्र
उसळतात उत्तुंग लाटांचे
दिवाभीत आवाज

त्यांचे अत्यंत सत्य
मुसमुसते संस्कार
उसळतात
पडद्यावर अननुभवी
पडत्या पांढऱ्या फेक ...

-0-0-

## दरीतून

अलंघ्य फाकणाऱ्या अंधाऱ्या दरीतून
वाहतोय हा जमाव ... पुरळ
फुटल्या द्रवावर चिकटतोय शीण
अस्थिर पण निश्चल मन ...

-0-0-

## चक्र

फिरते हे चक्र
लिंगभेद वजा
आयुष्य ही सजा
वाटेल की

गजांआड चंद्र
घेऊनी बसतो
मांड्यांनी तोलतो
विश्व सारे

-0-0-

## निरलस

एक निरलस निर्देश पोचतो शिगेला
अन् एखाद्या उत्तान आक्रमणासारखे
फुटून मोकळे होतात सर्व प्रवाह

सर्व दिशा ताणलेल्या
पडतात सैल

अन् एका सचेतन अंधारात
प्रगटतं सर्वांगभर
सळसळतं
फुलार आकाश ...
-0-0-

## फूल

हळूच प्रकाशे
वेदनेत फूल
सर्वस्वाला हूल
सर्वस्वाची

सर्वस्व उजळे
जळताना ताण
राखेतून त्राण
जन्म घेई ...

-0-0-

## अपाय

ओसंडून जाणे --
बुडत्याचा पाय
भोगाचा अपाय
क्षीण मेंदू

कोमेजता मन
हाडे खिळखिळी
वेढती या घळी
अंधाराच्या ...

-0-0-

## डोळे

अंधार कळण्यासाठी डोळे हवेत
पण अनुभव कळण्यासाठी मन ?

-0-0-

## अक्षरांची भाषा

अक्षरांची भाषा मला थिटी वाटते
कलाकृतींचे जन्मांध बाप
मनोऱ्यांवर एकाकी पडून आहेत.

-0-0-

## आपुल्याच

आपुल्याच देठी
आपुलाच ताण
किती सोसू व्रण
काळेगोरे ?

हळू जोपासल्या
आपुल्या बिंबाला
भोसकतो भाला
-- प्रतिबिंब.

व्हावे क्षणभर
देहाचे इंधन
मरणाचे धन
ओसंडावे ...

-0-0-

## अंधार

शेवटी ठरवणारे आपले आपणच
प्रत्येक ठरवलेलं जर न ठरवलं असतं
तर दुसरंच काही वेगळं ठरवलं असतं
( अंधाराचं विच्छेदन
अधिक सुरक्षित टांगलं असतं ? )

तारेवरची मोहक तनू
माणूस हा एक सस्तन प्राणी
ही तार आपली
ती तार तुपली
ही तार मधेच अशी
कशी हो तुटली ?

आला का प्रश्न ?
अंधार पडू लागला वाटतं.
शस्त्रं आणा.

-0-0-

## पूर्णविराम

चौबाजूंनी घेरलेला मी एक सदेह
कुरतडता हळूहळू मरणोपभोग
माणसाची प्रगती मला शून्य वाटते

ओल्या अंधारात दिवे जाणवतात
तर दृष्टी थकते
मग ती प्रतिबिंबंही काजळ धरतात

आपल्यात हा पूर्णविराम केव्हा कसा
रोवला गेलाय हेच कळत नाही
ती चिघळती जखम आपण जगतोय

विकट पहाटेला डोळा लागतो
काही पशुपक्ष्यांचे ओरडते अस्पष्ट आवाज
... जागं होणं म्हणजे स्पष्ट आवाज

-0-0-

### सावल्या

सावल्या सरकल्या
सुटल्या फोफावल्या
वाढल्या दूरवर
टॉवरवरून नदीपल्याड
आकाशातून पसरत पसरत
पसरल्या अनंतभर
झाल्या अनंत

अन् थांबल्या.

कुणीही अग्नी दिला नाही.

-0-0-

## वही क्र. ५

### माती

थांबलेल्या पावसाच्या मातीचा वास,
मातीच्या वासाचा भरलेला पाऊस.
मातीचे ढग,
मऊ, सहज, अलगद
... आणि वारा.

-o-o-

### आठवण

आठवणीत आहे
                    एक संध्याकाळ
कातरलेले मन
                    थरथरता पिंपळ.

-0-0-

## सूर्य

कारंजलेले थेंब --
-- सूर्यांची प्रतिबिंबे
कारंजलेले सूर्य --
-- थेंबांची प्रतिबिंबे.

-0-0-

# वही क्र. ४

### क्षण

अंधारातला तो
एक बध्द क्षण
नकळत फुटतो
क्षितीजावर जसे तांबडे !

-0-0-

### घाम

लाख रंध्रांतून येणारा घाम
जसा समस्यांचा शीण

-0-0-

### कोळसेवाला

कोळसेवाला
जगड्व्याळ प्रगतिकाठी
-- त्याच्यावर अनेक थर
अंधारे
डोळ्यात बोट घालून
कितीही उगाळले तरी ...
-0-0-

## दिशा दिशा

| | | | |
|---|---|---|---|
| वावरे लोकांत | । | दिशा दिशा आत | । |
| संबंध येता रे | । | बंध पडे | ।। |
| बोलविता धनी | । | आठवण तू रे | । |
| कालकूट सारे | । | प्राशी तूच | ।। |
| दिलेस कितीदा | । | घेतल्याशिवाय | । |
| रिक्तहस्ती जाय | । | माकड हे | ।। |
| दुधावर साय | । | धरे मन भक्ती | । |
| आसक्तीची सक्ती | । | अशी दुही | ।। |
| घरा घरा घर | । | फिरे चक्र थोर | । |
| गुंतागुंत सार | । | काही नसे | ।। |

-0-0-

## वारा

भूवस्त्राचा थर उचलतो वारा
आणि
कल्लोळते एकच
व्दिमन.

-०-०-

## वही क्र.३ ( १९६७ च्या आसपास )

## बेताल

फाड फाड थोबाडांनी ऊर बडवत किंचाळावं
चिंध्या चिंध्या भिर्कावत जगावर
शिव्यांच्या पावलांनी बेलात भंगावं;
चौखूर दोऱ्यांनी शिडं पाडावी सारी,
आपल्याच अकांडात मनं फाडावी सारी;
उद्ध्वस्त व्हावं;
आभाळाच्या आस्तित्वावर दोन्ही टांगा भिर्कावून
असंख्य बोटांनी ओर्बाडावं
उभयान्वयांचं जीवन.

-0-0-

## दृष्टिकोण

पार्थिव देहाच्या भावनांवर व्ययकर बसवला
तरी वर्णभेदाचं काय होणार ?

दृष्टिकोणांचे कर दृष्टिकोणांनीच भरावे लागतात
तोवर हे असंच -- आपादमस्तक
शरीरही न्याहाळता येत नाही तिथं
आभाळातल्या पृथ्वीचं काय कळणार ?

-0-0-

## मुळं

आमरण अट्टाहासात आम्हाला तडे गेले आहेत
म्हणजे तो अन् आम्ही यांची एकसमयावच्छेदेकरून स्थिती
म्हणजे आम्ही तसे अपर्याप्त म्हणून ही झटापट
अटीतटीनं आमचे पाय धावत असतात ... अन मंजिल
एक वा अनेक ... म्हणजे एकाच मंझधारेत की काय ते ...

संवादासाठी प्रयत्न जोरकस हवा. अक्लमंद. तडाखेबंद.
मोहशक्ती -- जादूगिरी काय कामाची ? प्रसंग म्हणजे
आपल्याच पानांचं झाड ... मुळं म्हणजे पाय नसले तरी चालू शकतातच की...

-0-0-

## रांगा

डोळ्यांत जळजळीत थर
सांडल्या केसांमागून पाहात
झिंगल्या बधीरतेतून जणू
स्थिरावल्यासारखं तरीही
पडण्याची भीती असलेल्या इमारतीतून दिसणाऱ्या
काळ्या रस्त्यावरून वाहणाऱ्या मोटारींच्या रांगा
स्वतःतल्याच अंधाऱ्या भिंतीवरून मुंग्या जशा

-0-0-

## चाबूक

जवळ स्टेशन
मालगाडीवर कावळा
उन्हात वळला रूळ
धूर
बाहेर टांगा
घोड्यानं झाडलाय पाय
चाबूक स्वंथ झोपेत

-0-0-

## एकाच वेळी

अनिश्चित मनाचा माणूस सराफकट्टयासमोर उभा
घडवत काही समांतर आकृती -- एकाच वेळी
अनेक रस्त्यांवरून चालू लागत स्वतःसाठी पण
कुणीही न समजत स्वतःला असमर्थपणे
निराधारपणे अशाश्वतीत गतीतून भीतीचा आधार घेत
कट्टयांचे धक्के सहन करत बाहेरचे आतले
ओलेत्या अंगानं पायऱ्या चढून -- चढताना
वाढलेल्या एका बाजूच्या पावलावर कोसळून
शृंगारल्या वधूच्या कल्पनेसमोर चूर होत
अश्रू ढाळीत चवऱ्यांवर कातर क्षणांच्या विचारमय
उभा पुन्हा धडपडत डोळ्यांपुढे काजव्यांच्या रेघा
पाहात वधू गेलेली मळून चितेच्या दिशेने

-0-0-

## चरित्र

तीनशे पासष्टात कुठलातरी एक वाढदिवस असेलच
दुसऱ्याच्या तोंडातून सिगरेटचा धूर डोळ्यांपुढून
गेला तरी गेला नाही असं वाटणाऱ्यांतला एकजण
सिनेमाला जातो -- तिथं कापला जातो कधीकधी केक
तोच तो दिवस समजून पाहतो पुन्हा तिरसट नजरेनं
दुसऱ्याच्या मालकीचा वासनाप्रधान हात एका उंच
शेलाटल्या गोऱ्या कमरेवरचा -- रात्री अंधार असतो
हे बरंच असतं चौकोनात राहणाऱ्यांना खांबाखाली
पापण्यांबरोबर दिवाही मिटू शकतो काजळी पापणीत
उघडत जन्मदिनानिमित्त सनईच्या सुरावटीत
अंधारातच वृक्षारोपण करून भणंग होतो एक आत्मा
अंधारात फडफडणारा चिरगुटाचा जाळ एका उघड्या
पडलेल्या स्तनावरचा पंख अलिप्तपणे वारा होऊन
उडून गेलेला असतो कबुतरे उडून गेलेल्या
विस्कटल्यासारख्या वातावरणावशेषांतून नजरबंद
हडळींच्या नजरांनी माणसांत वावरणाऱ्या एका चौकवासी
कलंदराचे जन्मरहस्य पांघरून - पावतुकडाही ...
कुठल्याही वस्तूवर पाहू शकत नाही रोखून माणसासारखा
दुसऱ्यांच्या तोंडातून निघालेले धूर असावेत मधे तसा
गढूळ डोळ्यांनी परक्या पावलांनी चौकातून चालत
येतो नगरपालिकेच्या मजलेदार इमारतीखाली साली
कोसळूसुध्दा शकत नाही इतका वेळ उभं राहून
पुढं गेलेल्या माणसांची विमानं वाजतात कानांत
वेडा जीव म्हणून हळहळून पुढे होतात ती धूर
ओकणारी माणसं लाव्हारसासारखा वाह्यला लागेल तो
पृथ्वीवर तिच्या जन्मपुराणाची आवृत्ती म्हणून

ओढलेली रेषा माहीत असते पण पुढेमागे नसतेच
ती की काय ते नकळत चालत असतो तिच्यावरून
डोंबाऱ्याची काठीही लागत नाही तोल सावरण्यासाठी
दुर्लक्षित वाटत असतो आपल्याच डोळ्यांतला चिखल
वेळही अशी येत नाही कधी जिच्या कमरेवर
वस्त्र नसते तीत बुडून जाण्यासाठी प्रलयात
होईल कधी खंडोपखंडांतून लाव्हा - उलटी
सुलटी माणसं पुढं पुढं जात असताना चेहरेदार
आपण असून जणू नाहीच असे इमारतीखाली आवाजात
विडीच्या थोटकाची आठवण गंजून पडून असते निपचित

हलून जातो कधीतरी वाऱ्याबरोबर स्तनावरचा पंख
मजल्यांखाली विझून जाते वफादारांची दुनिया
गोल असून माल बेगिऱ्हाईक असल्यासारखा दलाल
चेहरे धुंडीत विस्कटून जातो कधीकधी याही कफल्लक
धूमकेतूला वर्षानुवर्षांत कधीतरी न येता पर्वणी --
सारखा उगवत मावळत असतो जो डोळ्यांमागून
आकाशात नजर लावल्यासारखा डांबरी आयुष्यवाला
रस्त्यावरून वाळीत टाकल्यासारख्या सरपटत मन
न लावून
अंधारालाही पापणीचे केस परक्यासारखा जगभर
असा घोळक्यांतून घोळक्यांबाहेरून बोगद्यासारखा
गाड्यांच्या शिट्ट्या उडून गेलेल्या आभाळासारखा
बिनकल्हईच्या चैत्र वैशाख वसंत पावसाळ्यांतून
बोथटलेल्या धारांसारखा सांडत खिशांतून
मनाच्या अलिप्त संपृक्त गढूळतेतून नसल्याचसारखा
जणू असून बेहिशेबी कारभारात कोड्यांसारखा
वेड्यांच्या इस्पितळात टाकला न गेलेला असा जिवंत
ॲम्ब्यूलन्सवरच्या लाल चिन्हात आयुष्याच्या खुणा शोधू पाहात
स्मृतिभ्रंश झालेल्या चाकासारखा तिनिसांजेच्या
चिखलात अडकलेल्या पादत्राणाहून गलितगात्र
गर्भगळित मातेच्या नजरेत गुरफटून फुरंगटून
बसलेल्या बाळसेदार पोरासारख्या जगाकडे पाहात
अदुग्ध स्तनावरच्या दग्ध पंखासारखा उडत
युध्दांच्या वार्तांच्या उडत्या रद्द कपड्यांमधून
निष्प्राण आयुष्याला बोलासारखी तीट लावत ...
आगीचे बंब घणाणत जातात समोरून मुत्रीच्या
भिंतीवरील अक्षरांवरून नजर फिरवून गेल्यासारखे
उसळलेला डोंब चित्र काढून ठेवल्यासारखा कायम
जसाच्या तसा धुळकटत असल्यासारखा असलेल्या
डोळ्यांवरून उडून जातात जशी नावं गावं
वर्षं माणसं घोळके इमारती इस्पितळं चौक
रस्ते कारखाने दुकानं बुटांच्या चकचकीत दस्तेदार पलटणी ...

-0-0-

## तीन रेघा

व्याघ्रांबर पांघरून गुप्त होता आलं असतं
तर बरंच होतं नागरिकत्वही रद्द न होता
व्याघ्रांबरच का -- पीतांबर वा नीलांबर
का नाही या प्रश्नानं कासोटा सुटून
आभाळात उडालो बुवाबाज तंगडू
बेडकाच्या पाठीर तीन रेघा
तरी
ओढाव्या म्हणत होतो राम म्हणताना
जान गई पर आदत छुटी नही
असंच म्हटलं असतं मग संगळ्यांनी
आदरानं.

-0-0-

## खेकडा

दिवसातल्या खबदाडात
रात्रीचा खेकडा
पकडून बसलाय जुनाट विहीर
सावलीत हलतंय
उन्हाचं पान
खोडावर घट्ट जुनाट कोड

-0-0-

## चौकोन

गुणून भागून परततात दिवे,
रस्त्यावर चौकोन चाळीस पॉवर,
मानापमान होतात चहाची वाफ,
लगेच घरचं कोर्ट सुरू.
नंतर उजळणी.
सौला लागतो डोळा.
बरोबर, सौ म्हणजे शंभर, पुढं ? --
जेवण, गप्पा. शेजारी टप्पा.
पुन्हा घरी.
पोरं पऱ्यांच्या देशात.
मच्छरदाण्यांच्या चारचार दोऱ्या.
झोपेची वेळ.
तोवर बाहेर चौकोन पडून.

-0-0-

### ओथंब

निरोप देतो घेतो
क्षण राहतात आयुष्यात कुठंतरी लोंबकळत ओथंब
खऱ्या वा खोट्या मार्गांचे क्रॉसवर्डस्
पूल उतरतात चढतात अवाढव्य खाली वर
राजाच्या दिवसासारखी रोषण शहरं चमचमतात तारेही
वर आभाळात पाहिल्यावरच खालचं दैन्य जाणवतं
आणि दिलेघेतलेले क्षण डोळ्यांत चमचमतात
भीतीनं चढते आरास आयुष्याला प्रश्नांची
स्थिर पक्ष्यांचे डोळे थरथरत राहतात अंधारात
पझल्ड खांब तारा खेचून उभे रस्तोरस्ती
अंधार तारस्वरात साठू लागतो मग भल्याबुऱ्या हृदयांत
अजूनही ओले आहोतशा वाटणाऱ्या माशांच्या झुंडींच्या ...

-0-0-

### अंधार

घोडा पाहात दिवा समोर चकता पाऊस
अंधार झंझत कोसळत वारा आयाळ आळीत
काळात भिजत आयाळी खूप दळात सहत
पायांखालच्या वाहत्या काळोखात टापा स्तब्ध
ऐकत स्वारी आळीभरून कोसळ -- अंधार
चकत्या पाठींची हाडं वारीत शेपूटकेस
दृष्टीत द्रव चिकट दिवा गटांगळत वर
छप्पर टप टप चारा काळा अंधार -- क्षण.

-0-0-

### कारण

एवढंच देणार असशील तर मला नको आहे
कारण
संदिग्ध संपूर्णतेची स्पष्ट अपूर्णता होण्यापेक्षा
संपूर्ण नष्टताच मला अधिक पसंत आहे.

-0-0-

### रूपक

यशसुध्दा मानण्यावर ही शोकांतिकाच
कारण कशाच्याही अंताचं मानसिक सातत्य हे नाटकीच
रासायनिक अशा एकंदर अवस्थेत व्यक्तित्व
राजाच्या झगझगाटालाही कुजके अंडे मिळू शकतेच

विदूषक त्याचाही विनोद करू शकतो जे राजाला अशक्य
उष्ण शिलेवर राजा विचार करत बसतो
तिथं बसून गेलेल्या प्रेयसीनं पाहिलं तर नसेल
मित्र आपला राजतोल सावरण्याच्या प्रयत्नात
टाळ्यांचाही अथवा जिमी पोर्टरसारख्याला येऊ शकतो राग
समाज साला हलकटच अशा शिंका प्रतिक्षिप्त
सायकिॲट्रिस्ट विश्लेषणाला सरसावलेले असतातच
धीरोदात्त म्हणवणारे मंचावर आडवे होतात
छातीवर स्टेथॉस्कोपांची ओझी सहत
प्रेयसी छात्यांचे गुरुत्वमध्य ढळू न देण्याच्या प्रयत्नात
काहीसे करुण वाटणारे रिलीफही खोडसाळ प्रेक्षकच
रंगमंच हे रूपक असो नसो
हसणारे हसतात टाळणारे टाळतात
रडणारे आपले ओरडत राहतात
बऱ्याच टाळ्या वाजवण्या न वाजवण्याच्या हक्कावरच तुष्ट
कार प्रतिकारवाले हे बहुतेक बिनकारवालेच म्हणजे
अस्टेटसवालेच शिवाय ( वा समाधानाचं त्यातही काहींना )
एकंदर नाटकाचं महत्त्व एक्स्ट्राँवर अवलंबून नसतं
एवढी एकच सुखात्मिका
काहींच्या मते म्हणूनच
सगळाच हा एक प्रचंड फार्स !

-0-0-

## मुली

थिएटरात मुली
सायकलींवर पाय
रब्बरताण खडे
पाखरं जशी घोळक्यांतून
हल्लक प्रदर्शनीय

बोधप्रद डॉक्युमेंटरी
मुलांसाठी, तरुणांसाठी शाळा व कामे
पंगू

पिक्चर न् सायकली पुन्हा

द एन्ड
हे घोळके
मुली हसतात
सायकल पडते
पाय लचकतो
थिएटरभर हंशा
पिकतो मनानं बेचकीबहाद्दर.
-0-0-

## ' वस्तू ' च्या आसपासचे लेखन

### सत्य

ही सक्तीची झुंज
अखेर त्याला वेगळा पाडते ...
तो सामील होतो
आणि विसरत राहतो
वेगळे असणे आणि
एक पुनरुच्चार केलेले सत्य --
दुःख असते असत्य.

-0-0-

### झडप

ती नसती
तर मला कुणी ओळखले नसते.
माझा म्हटले नसते.

यासाठीच का ती सर्वांहून
अलग आणि तुटक ? आणि
एकाकी ?

तिच्यात माझ्या रक्ताचे अभिसरण
स्थिरावलेले पाहिले आणि सर्वात
मूलभूत भीतीने माझ्यावर झडप घातली.

माझा जन्मजात चांगुलपणाच
जणू
धोक्यात आला होता ...

-0-0-

### सिंह

माझी आयाळ एक प्रस्थापित सत्य
हिंस्त्र आणि अचूक
यंत्रवत् आपोआप, परंतु
परिणाम अपेक्षिणारी आणि भोगणारी

माझ्या चालीवर तिचे नियंत्रण
माझ्या क्षणांवर तिचे वजन
माझे जय, पराजय, प्रेम, क्रौर्य
सर्व तिचेच चलनवलन

तिच्या हालचालींतून
माझ्या जंगलांची निर्मिती ...
तिचा जन्म मी पाहिलेला नाही,
तिचे हक्क आपोआप गृहीत ...

-0-0-

**स्थान**

एकूणच सर्व बांधणीत प्रगतीचा
एक सूक्ष्म आलेखमय डाव
अनवधानानेच जणू आविष्कृत झालेला ...
याच्या बाहेर मला कोणते आकाश सापडू शकेल ?
शांततेचे म्हणून एक काही
सापडू शकेल असे स्थान असेल का ?

-0-0-

**क्षण**

अनुभवांच्या या महाप्रचंड गुहा आणि
त्यांचे सूक्ष्म अंधार यांच्या या सतत
वाढत्या ताणमय कमाईतून कोणत्या
पूर्णत्वाकडे मी उत्क्रांत होत असतो ?
की मृत्यूखेरीज दुसरा कोणताही शेवट
अस्तित्वातच नसतो ? सातत्याच्या
या शापमय छायेतून
सुटका होण्याचा क्षण कुठे असतो ?

-0-0-

**कंटाळा**

सर्व कणांना सर्व कणांचा
कंटाळा आलेला आहे ...
याला हे येतं, त्याला ते येतं
आणि तिसऱ्याला तिसरंच काही ...
शिवाय एकेका यशागणिक
एकेक रहस्य ...

-0-0-

## गर्दीची अपेक्षा

गर्दीची अपेक्षा करण्याच्या सवयीत
ते नकळत गुरफटले गेले ... असा
वेळ जात राहिला ... आपोआपच
एकमेकांना सावरायचा प्रयत्न करत राहणारी
रचना सिध्द झाली ...

-0-0-

## मार्ग

गोंधळात सापडल्यावर इतस्ततः
पडलेल्या टरफलांसारखे प्रश्नच
प्रश्नांतून पळण्याचे मार्ग
होतात की काय ?

-0-0-

## घोडे

हरिव्दारच्या स्वयंपाक्यांनी
घोड्यांचे पदार्थ केले
खाणाऱ्या सर्वांना चेव आला

सगळे बरेच दूर दूर जात राहिले
पण एका आंतरिक साम्यानं बांधलेले
एकमेकांच्या ओळखीचे

सुस्नात पहाटे घोडे धावतात
बायांपल्याडच्या गल्लीत
नवसाला पावतात ...

-0-0-

## कृतिशील

तिच्या दुःखाची दया,
डोळ्यांतल्या भीतीबद्दल सहानुभूती
अन् अपयशी आयुष्याबद्दल
अपराधीपणाची जाणीवही होती
मला ...
आम्ही एकमेकांना प्रेमाने वर्षले
आम्ही एकमेकांचे डोळे पुसले
तरीही आम्ही वेगळे का राहिलो ?

आता मी ओरडणार होतो कोणताही शब्द
किंवा राहणार होतो मूक ...
ज्या रचनेत मी हा शेवट स्वीकारत होतो
तिचा मी फक्त एक भाग होतो ...

-0-0-

## अटळ

कुठल्याच सुस्थिर पायावर
सुरक्षित राहू शकणार नव्हते आयुष्य
आणि संपूर्ण धोक्यात
अस्तित्वहीनच होणार होती
मी तयार केलेली सर्व मूल्ये ...

सर्व अर्थांना थांबवून धरण्याच्या
माझ्या प्रयत्नात
हे सत्य एक सवय म्हणून
सामावू शकणार नव्हते ...
अनुभव निरुपयोगी ठरणे अटळ होते ...

-0-0-

## तोल

खूपच परिपक्व
म्हणजेच सदोदित गोठू शकणाऱ्या
माझ्या वर्षानुवर्षांच्या जुन्या
नजरेला अशा एखाद्या सूर्यास्तातला
साधेपणा स्पर्शू पाहतो
आणि त्या स्पर्शाची सनातन
भीती घेऊन वावरणारा मी
याही घटनेचे सूक्ष्म आलेख
काढून चकित करू पाहतो
माणसांचे समुदाय
पुन्हा एकदा
तोल सावरण्याच्या प्रयत्नात ...

-0-0-

## माझ्यासमोर

माझ्या शरीराचे आक्रस्ताळे चाप सर्व
संपूर्ण अस्तित्वावरच जखडलेले होते
माझ्या सहनशक्तीच्या मर्यादेतच निसर्ग

होता सदोदित मला जोडलेला
ज्यातून अन्नद्रव्य मिळण्याऐवजी
मला निकराने जाणवत होती फक्त अगतिकता ...
या उन्हाला, या हिरव्या पानांना, या वाऱ्याला
आणि डोंगरांना का नाही राहता येत
त्यांच्या संपूर्ण शक्तीसह माझ्यासमोर ...

परकायाप्रवेश होतात पण एका आयुष्यात
एकच शरीर जे जसे असेल तसे सर्व
संपूर्ण चराचरात वागवावे लागते ...
माझ्या मर्यादांच्या या सत्याचे परिणाम
भोगणे अटळच होते कारण
निसर्ग निसर्ग नव्हताच ... फक्त
मीच होतो रोखला गेलेला ... हे
निळेभोर आकाशही किती केविलवाणे
निश्चित ... माझ्यासमोर ...

-0-0-

## आवरण

आयुष्य पारदर्शक असते
आवरणाच्या अलिकडून

कोणतीच गोष्ट तीच गोष्ट राहात नाही.

-0-0-

## समाज

सकाळी उठल्यावर चिमण्यांच्या आवाजाची
सवय असावी
तशी घराची ओढ
रक्तात मुरलेली ...
सर्व सामाजिक गोष्टींतही
जपलेला वेगळा स्वर
सूक्ष्म आणि नाजूक ...
घरातल्या समाजातही जेव्हा
पट्टया बदलताना दिसतो मी मला
एका सकाळी
तेव्हा अचानक सर्व चिमण्या
शांत झालेल्या ...
माझ्यातला समाज
माझ्या रक्तातून उडून गेलेला ...
-0-0-

## मी नेता

माझ्या हातून घडलेल्या हिंसेला माझ्याएवढीच
तीही माणसे जबाबदार आहेत -- आणि माझा
हाही सारांश मान्य करण्याइतकी
तीही निष्ठुर झालेली आहेत...
मुजरे स्वीकारण्याची धुंदी सोडली तर
मी एकटा असतो आणि ही सर्व माणसे
स्वतंत्रपणे माझ्यावर स्वार होत राहतात ...
मला तुडवत राहतात -- माझे खून पाडत राहतात ...
आमच्या अवलंबित्वाचे
हे माझ्यातले अटळ अस्तित्व असते ...
पण माझ्या मनाची ही छिद्रे
माझ्या कातडीबाहेरून
कुणालाच दिसणार नाहीत ...
हे सर्व अत्याचार मी पेलू शकतो
म्हणूनच मी नेता राहू शकतो
आणि माणसे स्वतंत्रपणेही
मला माझे पद बहाल करू शकतात ...
कारण हळूहळू एकमेकांव्यतिरिक्त
आम्ही वेगळे राहातच नाही ...

-0-0-

## इतिहास

कुरघोडी समाजरचनेची ही पोखरलेली मुळे
व्यक्तीव्यक्तीत विखुरलेली अस्वस्थ ... एकाकी ...
भरभराटीतही इथल्या अवाढव्य
फक्त इतिहासाची पुनरावृत्तीच
का राहते एक शापमय मूलस्त्रोत ?

-0-0-

## किनार

कोणतेच सत्य नसते हाताबाहेर, जरी
जवळजवळ बाहेरच असते काचेच्या धार
फार फार तर व्यासपीठावरून भाषण
देऊ शकतो एखादा विदूषक, जरी
आतबाहेर त्याच्या हास्य, अश्रू, प्रसंगावधान
आणि असते निश्चितशा
एकाच आयुष्याची किनार ...

-0-0-

## गाठी

उपयुक्तता आणि रचनांचे गंडेदोरे
बांधून आम्ही बुध्दिमान
येतो सदा एकत्र एकेकटे.
आमची सारी यंत्रे धपापती मोठी
आमच्या डोळ्यांवरची झोप
खोटी खोटी खोटी
प्रक्षोभातच आमच्या
सुटतात थोड्या गाठी.

-0-0-

## अनुभव

अनुभव म्हणजे तरी काय
भीती, त्वेष, माघार किंवा दिग्विजय ?
असल्यानसल्याने काय होते काहीही ?
-- हे स्वगत मी उच्चारित असतानाच
तिचे डोळे भरून आले ...
या प्रश्नांना माझे तोंड देणे
हा तिला छळ वाटत होता ...

या दयेच्या अश्रूंनी ती
माझ्याशी तादात्म्य पावली होती.
तिचे संपूर्ण आयुष्यच जणू
माझ्या या अवस्थेपुढे अप्रस्तुत होते.

" माझं तुझ्यावर प्रेम आहे " -- मी म्हणालो.

" खरंच रे, तुझ्या मनाच्या कित्ती कित्ती
वर्षावांची मी वाट पाहते आहे ...
आणि तू तर ... "

माझा तिचा अनुभव
वेगळा ठरत होता ...
ती आणि मी
देत होतो की घेत होतो ...

-0-0-

## राम

टेबलांचे मळकट काळपट चौकोन,
रॅक्स, खुर्च्या, कागद, फाईली
हे सर्व धुळीने मानवी शिस्त
पत्करण्याचा केलेला प्रयत्न होते.
या अवाढव्य प्रयत्नावर आपली
उपजीविका चालवणाऱ्यांपैकी
राम हा एक होता. उपजीविकेची
कल्पना एकदा स्वीकारल्यानंतर
त्या त्या मर्यादांचे अविभाज्य अस्तित्व
ओळखून स्वीकारून चालणे
हेच एकूण शहाणपणाचे होते.

जिना उतरून रस्त्यावर आल्यावर
सुमारे पाव मिनिटात डोळे सरावत.
वाहने, माणसे, हॉटेले, दुकाने,
यांतून वाटा सापडत ... असंख्य
अडचणींतून सुटका होत राही ... आणि
एखादी रेकॉर्ड वाजून संपल्याप्रमाणे
हे सर्व संपे आणि राम घरी पोचे.

हाडामासाच्या जिवंत, उद्दीपनात पटाईत
अन् प्रसंगी रोग पसरवणाऱ्या
वेश्या जर तुम्हाला चालतात तर
चारदोन शरीरसंबंधांच्या वर्णनांचे लेखनच
तुम्हाला का खुपते ? लोकांच्या
भक्तिभावनांवर हुकुमत चालवणे जर
त्याज्य नाही तर लिंगभावनाच का नको ?

राम हा एक लेखक होता. काही लोक
त्याला अश्लील म्हणत. हेही तो स्वीकारी.
म्हणे, " म्हटलं तर सगळं सुटं सुटं,
म्हटलं तर मिळून ! त्यातही लोक
निवड करतात हे आश्चर्यच ! "

त्याच्या पायांचे एकेक बोट
वाकडे होते आणि अंगठे
कमीजास्त उंचीचे होते.
पाठीवर एक तुळसपान होते.
केस भरपूर पण मोकळे होते.
त्याच्या चष्म्याची फ्रेम काळी होती.
तो फक्त कोल्हापुरी चपलाच वापरे.
जाड, लक्ष खिळवून ठेवणारा आवाज,
विचारवंत डोळे आणि थोड्या उघड्या

तोंडातून चमकणारा दात - असा तो
एकूण होता -- गंभीर, मजेदार, बेधडक,
नवरा, बाप, कारकून, भाऊ, नागरिक,
समुद्रावरचा सूर्यास्त अधाशीपणे
ओरबाडून गरगरीत डोक्यात साठवणारा ...

प्रत्येक माणूस एकेक राष्ट्र धरले
तर रामचेही स्वतःच्या मातीतून
तयार झालेले परराष्ट्रधोरण होते.
त्याच्या मर्यादेतील आंतरराष्ट्रीय क्षेत्रात
त्याचे असे एक स्वतःचे स्थान होते.
परराष्ट्रधोरण आणि संरक्षणधोरण
यांतून निर्माण होणारे ताण
त्याचे आयुष्य विणत -- घडवत राहात.

अश्लीलतेचा अपवाद सोडला तर
लोकापवाद नको म्हणून तो मतदानही करी.
जगाच्या चालचलणुकीला हातभार लावी.
भ्रष्टाचार करण्यापेक्षा न करणेच चांगले
असे त्याचेही मत होते.
XXX
स्टेशनवरचा पहिला बोर्ड काढून तात्पुरती
' अयोध्या ' या बोर्डाची स्थापना झालेली होती.
पताका फडकत होत्या, तोरणे डुलत होती.
गावात कमानी उभारल्या होत्या.
सर्वत्र गुढ्या, सनई, ताशे आणि फुले ...
... रामाच्या स्वागतासाठी सर्व सज्ज होते.
वनवास संपवून राम आणि कुटुंबीय
परतत होते ... गाडी रामची होती ...
इन टाईम होती. मानवी आयुष्याची
मर्यादा स्वीकारल्यानंतर
निरनिराळ्या प्रसंगांचा पट अटळच होता...

गाडी आली. जनता क्लासच्या गर्दीतून
वाट काढत राम आणि कुटुंबीय उतरले.
कुणी त्याच्या हातातले धनुष्य घेण्यास पुढे झाले.
तर कुणी त्याच्या पायाला स्पर्श करण्यास.
थोड्या लांब अंतरावर असलेल्या काहींनी
त्याचे दर्शन नीट व्हावे म्हणून गॉगल्स काढले.

जनता वाट पाहात होती. राज्य वाट पाहात होते.
राम राजा परत आला होता ...
XXX
एका प्रचंड वादळातून आल्याप्रमाणे
रामला वाटत होते.

टीका, टिप्पणी, लेखक, समाजधुरीण,
विद्वान, धार्मिक -- सर्व गदारोळ
संपला होता.
त्याच्या ' वनवास ' या कादंबरीवरची
बंदी उठली होती.
छापखाने धडाडले होते. वृत्तपत्रे आरोळली होती.
एकदा ' अश्लील ' हा शिक्का बसून गेला होता
- हेही बरेच झाले होते. खप वाढणार होता.

कादंबरीचा शेवट असा होता :--
" तिला पुन्हा वनातली ती रात्र आठवली.
खूप संभोगल्याप्रमाणे स्मृती जणू
थकून गेली होती. तरीही काही प्रसंगांतले
आठवणींचे ओघळ सरकले गेले.
मनाबरोबरच शरीरालाही पुन्हा
त्यांची ओल जाणवली. पण थकव्याने
आठवणही मलूल झाली. तिला आता
काहीच नको होते. संपूर्ण जग थोडा वेळ
नष्ट व्हावे आणि मग पुन्हा जन्माला यावे
असे तिला वाटले."
रामलाही काहीसे तसेच वाटत होते.
माणसाला देवत्वाचा स्पर्श व्हायलाच हवा
असे त्याला प्रथमच उत्कटतेने वाटत होते.
म्हणजे काय हे मात्र त्याला माहीत नव्हते.
ही अपेक्षाही मानवी शिस्तीचा भाग व्हावी
याची त्याला मनस्वी चीड येत होती.
सगळेच जणू अविभाज्य वाटत होते.
आणि नुसताच थकवा येत होता ...
" कशामुळे काय घडते आहे
याचे धागेदोरेच जणू
तिच्या हातून निसटून गेले होते ... "
- हे वाक्य सुचलेले असूनही
' वनवास ' मध्ये घालता आले नव्हते
याची अस्पष्ट रुखरुख
जाणवत होती ...

-0-0-

**बंद**

सर्व
एकलेपणा ...
बंद पडूनही जागच्या जागीच
स्वतःचाच छळ करीत
धुमसत राहिलेले दिवस ... स्वतःच्याच आयुष्यातले ...
-0-0-

## कल्पना

अधिकारग्रहण केले
तेव्हा सूर्याने तोंड फिरवले होते
की लोकांच्या कोलाहलात तो मला दिसला नाही
ते मला कळले नाही.

समेट घडवण्यासाठी केलेले प्रयत्न
आणि वैभव टिकवण्यासाठी छाटलेले कोंबडे
यांच्यांतील अभेदाची जाहिरात करण्यासाठीच
माणसाचे आयुष्य -- दैदीप्यमान !

खुनाचे रहस्य उलगडू नये
आणि सर्वांनाच मूग गिळावे लागावे
याच्याइतका केविलवाणा एकाकीपणा नाही.
कल्पना अशी की खुनापूर्वीची ती व्यक्ती आपणच !
-0-0-

## मी एक य.

मी एक य. माझे अ प्रकारे जगणे.
ब प्रकारे जगणाऱ्या क्ष ला विरोधी वाटते.
( किंवा उलट असेल.)
अन् संघर्ष उभा राहतो.
बरं, वाईट, खरं, खोटं, हित, अहित -- गोंधळ उडतो.
-0-0-

## परिपूर्ती

औषधं करा गडप
आणि घ्या
आमच्या गुप्त आणि उघड्या
भागांतलं रक्त.

कुठल्याही फालतू माणसाच्या आयुष्यापेक्षा
तुम्हा हलकटांना धन मिळणं महत्त्वाचं आहे.
एखाद्या फालतू माणसाला मिळणं बळी
होण्याचा मान - हेच किती मोठं आहे.

माझ्या फालतू बांधवांनो व्हा सारे एक
पेटवू, होरपळून भस्म होईल या हलकटांचे,
लावू तेच
आपल्या गुप्त आणि उघड्या भागांवर

एका घटनाक्रमाची परिपूर्ती म्हणून.
-0-0-

## पाकळ्या

बाहेरच्या गर्दीतून ऐकू येतात आरोळ्या
त्यांच्यासमोर जाताच काही क्षणांतच होईन मी
छिन्नविच्छिन्न -- आणि त्यांना एकमेकांना न समजणाऱ्या
वेगवेगळ्या भाषाही होतील एकाच फुलाच्या पाकळ्या ...

मी बाहेर गेलोच नाही तर इथल्या इथेच
ठरणार आहे ती आत्महत्या
अन् गेलो तरीही ... त्यांच्या हातून...
-0-0-

## पॉलिसी

दैनंदिन कामाच्या निमित्ताने आम्ही समोरासमोर आलो
चूक बरोबर मतभेद हास्यविनोद अन् मानवतावाद
असा ओढाताणीचा नॉर्मल अन् किचकट होत गेला
एकामागोमाग दिवसामाहिन्यावर्षांचा काळ
खुर्चीचा मान राखला जाणे महत्त्वाचे होते
जनतेला द्यायची होती सौजन्यशील सेवा
यात बचावाने टाळायचे होते स्वतःचे अपमान
स्वच्छ काचांच्या दोन्ही बाजूंना माणसे ...
त्या काचांमुळे एकमेकांच्या आवाजांत होणारे फेरफार
याबाबत कित्येकदा आमचे एकमत होई
इव्हन अ स्मॉलेस्ट थिंग कॅन बी अ पॉलिसी मॅटर
असे म्हणत पायऱ्या उतरताना क्षणभरच अचानक
ओळखून राह्यचो आम्ही एकमेकांना ...
एखाद दिवशी चुकून यावरही होऊन जायचे एकमत --
अवर बिहेविअर कॅन नेव्हर बी अ पॉलिसी मॅटर -
-- खुष व्हायचो आम्ही दोघेही आपापल्या हुशारीवर
अर्थातच वेगवेगळ्या कारणांनी ...
-0-0-

## पूर्वायुष्य

या भागात सर्व तऱ्हेचे सर्प निघतात
हे कळताच कडेकोट झाले मन
आणि मानसिक घरात
सदोदिन फणा काढू लागले नाग

मन झाले घर सदोदित
सापाला तोंड देण्याच्या पूर्वतयारीतले
अन् आयुष्य झाले फक्त पूर्वायुष्य
सर्पदंशाचा शेवट असलेले.
-0-0-

## प्रलय

घनव्याप्त आकाशासारखे
नागरिक चहूंकडे
अन् हिंसेपासून बचावात्मक
माझा हिंसक एकाकी मूड

आपल्या सर्वांच्या रक्ताचे पाट वाहताहेत
आपापल्या शरीरांतून हेच बरे आहे
एखाद्या प्रलयाची वाट पाहात
निदान आयुष्य तरी कटते आहे ...

-0-0-

## मुंबई

एकाच ठिकाणी जमा झालेल्या असंख्य माणसांची गर्दी,
समुद्र, खारा दमट वारा, मरीनड्राईव्हचे अर्धवर्तुळ,

लोकल्सची लटकंती, गती अन् खूप दिवस
न भेटलेले काहीजण ... जणू जिवलग ...

माझे मुंबईसारखेच स्वयंचलित मन
आज स्वतःचे रूप न्याहाळण्यास उद्युक्त ...

-0-0-

## फालतू

आपले म्हणण्यासारखे गाव नाही
व्यक्तिमत्वे एकमेकांत मिसळलेली मैत्री नाही
स्वतःच्या आयुष्यातही
वेळप्रसंगी उगाळण्यासारख्या आठवणी नाहीत
असा एक फालतू
कोरडा ठणठणीत माणूस तुमच्यासमोर

मित्रांनो त्याला काही द्यायचा प्रयत्न करू नका
उलट
तुम्हाला निश्चित वाटणाऱ्या सर्व गोष्टी सांभाळा.

मुख्य म्हणजे
त्याला पिटाळा. वेळ न दवडता.

-0-0-

## सूर्य

सूर्यही आच्छादित माझ्या अनुभवाने.
माझ्या निरपेक्ष सूर्य मी पाहिलेलाच नाही.
सर्वनिरपेक्ष सूर्य कसा असेल ?
मोजता येईल तो एखाद्या संख्येत ?
कदाचित तो असेल सूर्य जिवंत
एकाच क्षणात असंख्य शक्यतांचा
किंवा असेल शून्य शक्यतेचा शांत.
अनेक आच्छादित सूर्यांच्या जगातला
संघर्षमय अंधार मात्र असह्य आहे.
सूर्य म्हणजे माझ्या व्यतिरिक्त सर्व काही.

-0-0-

## प्रकाश

रोषणाईत तल्लीन माणसे
एक झिंग आणणारे द्रव्य
-- प्रकाश.

-0-0-

# ' युध्दाच्या कविता ', ' सवंगडी ' च्या आजूबाजूला झालेले लेखन

## तुम्ही

तुम्ही सुखासीन. कुर्बानी नाही, त्याग नाही, ऊब नाही,
उष्णता नाही. मुख्य म्हणजे तुमच्यात तथ्य नाही.
तुम्ही आत असल्याचं दाखवता पण बाहेरच राहता.
एकूणच दुःखाला आपण सगळेच जबाबदार आहोत
असं नुसतं म्हणत राहणं. खरं तर तुम्ही काहीच
केलं नाहीत तरी चालेल. तुमचं असणं हे नसण्याइतकंच
महत्त्वाचं आहे. तुम्ही ढोंगी आहात. क्रूर आहात.
सूक्ष्म सावधानीत सौम्य सोज्ज्वळ वागण्याचा तुमचा
छुपा आनंद. तुम्ही स्वतःला सुसंस्कृत म्हणवता
पण रानटी आहात. हिंसक व्यक्तींना ठार
मारायचं ठरलं तर तुमचा पहिला वध व्हावा.

हे सगळं ऐकूनही तुम्ही डगमगत नाही. तुम्ही
निर्लज्ज आहात. हे मान्य करायचंही तुमच्यात
धैर्य नाही. तुम्ही भित्रे आहात. थंड फरशी आणि
निरर्थक चकाकी आहात.

तुम्ही कुठलेच आरोप खरे नसल्यासारखे शांत
राहता. तुमच्या संपण्याला महत्त्व न देता
आम्ही तुम्हाला संपवून टाकू. किंबहुना तुम्हाला
जिवंत राहू देऊ.

एवढ्यानं अपमान तरी होतोय का ? तुम्ही आंधळे
आहात. बहिरे आणि मुके आहात. विकृत
आणि रोगी आहात. रोगी आणि वेडे आहात.
शिवाय समाजविघातक आहात. आणि ...

-0-0-

## उद्योग

तप्त उदासीनतेचा उद्‌गार
सोडवणार आहे का यातून ?
शब्दांना शंभर पीळ
देऊन काय होणार आहे ?

आक्रमणाचा सूक्ष्म
वासही मला चालत नाही
-- इतके स्वच्छ
कसे राहील आयुष्य ?

एवढे माझे महत्त्व काय आहे ?
मला इजा न करू शकणारे जग
निर्माण करणे हाच मला अशक्य
लावून दिलेला अविरत उद्योग आहे का ?

-0-0-

## सूर

विषण्णतेचा सूर हळूहळू टिकत जातो.
वाटतं, बरं झालं, एकदाचा आयुष्याला सूर लागला.
आता विचलित होण्याचा तरी प्रश्न नाही.

-0-0-

## की मी चुकून

मला माहीत असलेले सगळे पत्ते
कसे हरवले ?
झाडांच्या ठिकाणी दुकाने,
हॉटेल होते तिथे शाळा

आणि इस्पितळाच्या ठिकाणी मैदान !
रस्त्यांचे आकार आणि नावेही वेगळी !
हे असे कसे झाले !
की मी चुकून सारखा
दुसरीकडेच भरकटतो आहे ?
माझ्या ओळखीची घरे आणि माणसे
मला सापडणारच नाहीत का ?
-0-0-

## जरा वेळ

मला पकडले तेव्हा
दहा वाजून दोन मिनिटे झाली होती.
खूप दिवस झाले.
फाशीची वेळ कोणती असेल ?

शब्द आणि फास निरर्थक असल्याप्रमाणे
कवडसा लहान लहान होत होता ...

आता बहुतेक मला झोप लागेल
जरा वेळ.
.-0-0-

## आरोप

माझ्या मर्यादांची शक्ती
मी व्यक्त करण्यात चूक कसली ?
माझ्या चेहऱ्यावरच्या कर्मठ तेजाने
अनेकांना आकर्षित केले.

माझ्यावर खुनांचे आरोप ठेवले गेले नाहीत.
आत्महत्येचा आरोप ठेवला गेला
तेव्हा मी फक्त हसलो. कुत्सितपणे.
-0-0-

## फितूर

तू आक्रमण करीत होतीस की
संरक्षणाचे नाटक ?

तुझ्या त्या तटस्थ पराभूत क्रूर हास्यानेच
माझे धैर्य एकवटले.
तुझ्या फितूर सैन्यावर मी
तुटून पडलो ...
-0-0-

## अंमल

मूल्यांच्या तोडग्यांवर
अंमल करतेय परिस्थिती
तोडगा होऊन ... कोडगेपणाने ...

-0-0-

## मौन

मौनही हिंसक.
गल्लीबोळ खोटे शांत.

हुतात्म्यांसारखे क्षण.
भविष्याचे पुतळे.
फक्त ठिणगीचा अभाव.

तुझी नजरभेट अशक्य.
मी मौन.

-0-0-

## कुंठित

सगळी माणसे कुठेकुठे पाठिंबा देत,
कुठेकुठे विरोध करत गेली तेव्हा
चकितपणातच माझे काही क्षण गेले.

विचारांचे समुदाय पाहून
कुंठित होऊन राहिलो.

-0-0-

## कर्तव्यदक्ष लोकांची सकाळ

पुस्तकाच्या पानांनी मेंदूला लावलेल्या सवयी,
भाषेचा अमोघ वापर करण्याचा सराईतपणा,
संबंधांचे तोलबिंदू स्थिर करण्याचे कसब,
संदर्भांचे हजरजबाबीत्व आणि
दिसण्यातली निरोगी सफाई -- ही
जागतिक प्रश्नांना तोंड देण्याची हत्यारे
जागी होतात तेव्हा प्रश्न किरकोळ वाटतात.

वस्तूंची मांडणी करून टापटीप साधते
तितकीच सुलभ - शक्य वाटते संघर्षहीनता.

अनुभवांची पक्व संस्कृती एखाद्या
संरक्षक कवचासारखी सज्ज असते.
अत्यंत शक्तिमान माणसांतली स्पर्धाही
कौतुकास्पद असते जनकल्याणगामी.

निसर्ग जणू या सर्व हत्यारांना अजिबात
भीत नसल्यासारखा गजगती -- स्पर्शहीन.
जणू सगळीच निसर्गनिर्मिती !
घटना आणि निसर्ग, घटना आणि कर्तव्यदक्ष लोक
यांच्यांतली ओढाताण निरनिराळ्या काळांत
ठिकठिकाणी स्थिरावत राहते. सकाळचा
उत्साह तीव्र होत होत रात्री विसर्जन पावतो
दरीत कोसळणारा प्रपात होऊन. प्रत्येक सकाळ
सुरुवात असते कर्तव्यदक्षतेत अधिकाधिक
पक्वता आणण्याची ...
-0-0-

## अटकळ

लोक म्हणाले मी खोटे बोलतो आहे.
वस्तुतः मी दुर्लक्षितच आहे.

मला त्यांच्यांत सामावून घेण्याचा
हा आणखी एक डावही असेल.
याने माझा स्वाभिमान दुखावला गेला.
ते पाहून एकदम हर्षच झाला त्यांना.
दुखावलेले स्वाभिमान समाजात सहज
सामावले जातात ही त्यांनी
आधीच बांधलेली अटकळ होती.
-0-0-

## हिंसेची गाणी

आता हिंसेची गाणीच आम्हाला
अधिकाधिक आवडत जातील.
अत्यंत तीव्र प्रतिक्रिया
जाग्या झालेल्या आम्हाला आवडतात.
आपण आहोत
हे तेव्हा प्रकर्षाने कळते.

आता आम्हाला
आमच्या प्रत्यक्ष असण्यापेक्षा
आमच्या असण्याची खात्रीच अधिकाधिक
पक्की करत राहण्याची गरज आहे.
-0-0-

## काहीबाही

दु:खाचे कारण खरोखरच
आपल्याला माहीत आहे का ?
की नुसतेच आपले त्या त्या काळात
काहीबाही घडून जायचेच असते ?

समर्थनाची कुशाग्र हातोटी,
त्याचा झटकन प्रसार करण्याची शक्ती आणि
बसवलेला पगडा टिकवण्याची हुशारी
-- या मार्गानेही सुटतील आपले प्रश्न ?
-0-0-

## झाड

मी झाडाकडे उध्दटपणे पाहिले
तर त्याची पाने मरगळून गेली.
झाडातला न्यूनगंड पाहून
त्याच्यावरचे पक्षी उडून गेले.

हे झाड काही माझा सूड
घेऊ शकणार नाही. हे नक्की.
-0-0-

## बेभान

मलाही कधी
समक्षतेत विश्रांती सापडलेलीच नाही.
कृतीत मी जवळजवळ बेभान असतो --
स्वयंचलित. सतत.
-0-0-

## अंतर

वर्कशॉपमध्ये काम करत असलेल्या कामगाराप्रमाणे
मी सुटे भाग कुशलतेने हाताळत गेलो...
ते सुटे भाग जिवंत असून मला धूर्त समजतात
हे लक्षात यायला वेळ लागला नाही ...

दुसरी माणसे आणि मी यांच्यांत कायमच
एक अंतर राहात गेले ... माझ्याबद्दल
कधीच कुणालाच खात्रीची जवळीक वाटली नाही ...

-0-0-

## प्रयत्न

माणसे म्हणतात
मी त्यांना ओळखत नाही ...
... खरेही असेल !
कसलीच खात्री नाही आता ...
जणू काही माझा आत्महत्येचा प्रयत्न
फसल्यासारखे वातावरण आहे ...
माझे शुध्दीवर येणे
हे प्रयत्न फसल्याचेच
लक्षण मानताहेत सगळे ...

-0-0-

## उत्सव

त्यांना थकवा आला तेव्हा सध्या
हा एक उत्सव संपत आल्याचे
त्यांनी ओळखले.
अश्रूंनी भरभरून निरोप देणेघेणे झाले.

मी फक्त कोरड्या डोळ्यांनी निरोप घेतला
तेव्हा ते हळवे झालेले दिसले.
माझी इच्छा असूनही माझ्या डोळ्यांत
पाणी येत नाही असे त्यांना वाटले की काय ?

-0-0-

## विकृती

विकृती जर अटळच आहे तर आत्महत्याही
अविकृत कृती असू शकत नाही -- असे मी
म्हणताच टोकाची भीती दाटून आलेली दिसली
समोरच्या डोळ्यांत. आता एखाद्या श्वापदासारखा
निकराचा हल्ला अपेक्षित होता.

-0-0-

## अपराधी

मीही नुसताच एक समाजाचा भाग
म्हणूनच वावरतो आहे तर !
अत्यंत अपराधी वाटत राहिले --
अगदीच वैयक्तिक ...
-0-0-

## तेव्हा वाटले

ते मनसोक्त आणि मी
ओशाळे हसत राहिलो.
शेवटी शेवटी तर लांब जातानाही
हसण्याचे आवाज येतच राहिले.
थकून गेलो.
ओशाळे हसण्याचीही शक्ती राहिली नाही.
तेव्हा वाटले क्षीणपणे -- उठावे
एकदाच आणि हसावे कंठरवाने कर्कश
संपूर्ण निर्लज्जपणे.
आणि अंग मुडपून
मी पडून राहिलो.

-0-0-

## न्यायाधीश

जितका मी स्वतःला महत्त्वाचा मानत राहीन
तितके घटनांचे महत्त्व वाढते राहील.
घटनांचे महत्त्व वाढण्याची शिक्षा
आपोआप
माझा मीच न्यायाधीश !

-0-0-

## पंजे

प्रत्येक क्षणावर उमटणारे माझे पंजे
काळाला काठिण्य देऊन नासवताहेत.

-0-0-

## आव्हाने

सरळ आता दोन्ही बाजूंची आव्हाने
कबूल करणेच सरळपणाचे होते.
कबूल करणे आणि कबूल न करणे
दोन्हीही
डावपेचात्मकच राहणार होते.

-0-0-

## युग

देवाणघेवाण आणि ॲडजस्टमेंटस्
यांच्या जाणिवा हजार तऱ्हांनी
करून देणाऱ्या या युगात
कुठेही टोकाला जायचे नाही ही प्रतिज्ञा
करणे भागच आहे -- जिवंत राहण्यासाठी.

एक प्रकारचे दबलेले आणि दबा धरून
बसलेले वरवर निरुपद्रवी वातावरण.

गतिमान स्थैर्याचे हे छळवादी युग
आमचे आम्हाला लखलाभ ...

-0-0-

## तरीही

कुणाच्यातरी
भडक निनावी तक्रारींप्रमाणे मी
नसण्याचीच शक्यता जास्त आहे
असेही ठरेल. परंतु याच्याबद्दल
अशी अशी पत्रे आली होती हा
एक ठाम भूतकाळ तयार झालाच.

म्हणजे आता आपले आयुष्य
जगत जाण्याव्यतिरिक्तही भूतकाळ
तयार होण्याच्या अनेक शक्यता आहेत
याची जाणीव होत होतच आले लक्षात
-- हळूहळू मी असंख्य
भूतकाळांतून शाबूत राहिलेला
म्हणून ओळखला जाऊ लागेन.

तरीही
मी असा असा आहे
हे नाही म्हटले तरी तसे मी अजून
खरेच धरून चाललो आहे ...
-0-0-

## नियती

नियती म्हणजे काहीना काही
खरे धरून चालणाऱ्या मनस्थितीला
हमखास धक्के देणारी शक्ती...
-0-0-

## विजयोत्सव

मी चांगला ठरतो की वाईट ठरतो
याकडे माझे लक्ष राहणे
अपरिहार्य आहे. मूर्खपणामुळे.
वाईट ठरल्यावर दुःखी होणेही.
मूर्ख दुःखी.

विदारक घटनांचे हे अनुभव
मला शहाणा करू शकले नाहीत
तर
माझ्या मूर्खपणाचा तो
अभिमानास्पद महान विजय ठरेल.
जितका मी अधिकाधिक दुःखी
तितका मी अधिकाधिक विजयी.
दुःखोत्सव = विजयोत्सव !
-0-0-

## स्वप्न

कसे केले म्हणजे काय होईल
याचे मला अंदाजच नसतात.
त्यामुळे ज्या त्या भूमिका या
तात्पुरत्या अपरिहार्यच धरून चालतो मी.

कोणतीही भूमिका एक अध्याहृत
संघर्ष घेऊनच येते. त्यामुळे
पूर्ण माणसाचे स्वप्न
कधी पडतच नाही मला.
-0-0-

## पोकळी

सौंदर्य आणि दुःख यांचा
हा मनोज्ञ संगम
एका कलात्मक रोगाचा उगम ठरला
तेव्हा कृतकृत्यतेचे पाणी
त्याच्या डोळ्यात चमकू लागले.

नंतर एका अचानक वेळी
विचारांची अगतिक शक्ती असह्य झाल्याने
त्याचा आत्महत्येने मृत्यू झाला.
पोकळी निर्माण झाली.
तिला नम्र सलाम झडले.
-0-0-

## दुःखाची भाषा

दुःखाची भाषा जास्त खोल समजते
म्हणून मी त्या भाषेत बोलावे
ही अपेक्षा पाहून थक्क झालो.
मूक झालो.
मला अचानक महत्त्व आले.
भीतीचे सर्व प्रकार
भोवती भिरभिरू लागले.
कारण
माझी तर उलट
त्या भाषेतून सुटण्याची
धडपड चालू होती !
-0-0-

## उजाड

आयुष्यातून सर्व गावे, वस्तू आणि शरीरे
उठून गेलेली. सर्वत्र वरवर निरुपद्रव.

मी उजाड झालो आहे.
म्हणून माझी भाषा उजाड.
-0-0-

## ताबा

घटनांवर ताबा मिळवला गेल्याचे दिसते
तेव्हा वस्तुतः किती गोष्टी
जमून आलेल्या असतात !
शेवटी घटनांचा इतिहास
म्हणजे तरी काय ?
संबंधरचनांची ती एका विशिष्ट प्रणालीची
अर्धवट समजूतच नसते काय ?
-0-0-

## पाऊस

समाज हा एक विशिष्ट पाऊस असतो.
त्यातली प्रत्येक धार इतर धारांना
जोडलेली असते.

पावसाच्या धारा
पावसात भिजलेल्या नाहीत
हे कसे शक्य आहे ?
-0-0-

## जपून

माणसांशी अत्यंत जपून वागताना
शब्द सुटे सुटे वाटत राहिले.
एका सलग भाषेचे भानच हळूहळू हरपत गेले.
स्वतःशीही स्वतःच्या भाषेत बोलणे अशक्य झाले.

इतके होऊनही मी
त्यांच्या भाषेत बोलतो आहे
असे त्यांना वाटत असल्याची
खात्री नाही ती नाहीच ...

-0-0-

## वर्दळ

नाहीतरी ही मुलगी लाडाने वाया गेली असती ।
आता ती तिरस्काराने वाया गेली इतकेच ।।
मुलुख एकाकी होता तरीही ।
भावनेच्या सातत्याने दरवळून गेला होता ।।
कोण कोण कशाकशाकडे दुर्लक्ष करत आहे ।
कायकाय महत्त्वाचे आहे ।।
माझ्याऐवजी दुसराच कुणी असता ।
तर दुसरेही काही घडू शकले असते ।।
अशा अशा परिस्थितीत असे असे घडल्यावर ।
नंतरची घटना अमुकच असेल असे काही नाही।।
निर्भय बनण्याशिवाय मार्ग नाही ।
निर्भय बना आणि आमच्या बाजूला या ।।
स्मृतीत कोरलेले कित्येक प्रसंग ।
मेंदूतल्या अमुकअमुक प्रक्रियेमुळे स्मृती टिकते।।

-0-0-

## लिंक

माझा चेहरा पाहूनच तो चपापला.
बहुतेक त्याला तो त्याचाच विस्मृत चेहरा वाटला.
काय झाले हे कळण्याची गरजच नव्हती.
माझ्या चेहऱ्याचा मला मुळीच अभिमान वाटत नव्हता
किंबहुना
मीच श्रेष्ठ असल्याप्रमाणे तो
त्याच्याकडे पाहू शकलो होतो.
अचानक सगळी
लिंकच निखळून गेली होती ...
-0-0-

## खिसे

माझे खिसे तुम्हाला रिकामे सापडले.
स्वतःच्या भावना आणि जाणिवा
मला संशयास्पद मूल्ये दिसत होत्या
तर मी तुम्हाला लाच तरी काय देणार ?

तुम्हाला वाटले -- मी गेलो.
विजयोन्मादी गुर्मीत जल्लोष पावलात.

मला अधिकाराची गरज नाही.
मी कधीही येईन.

देणेघेणे, जाणेयेणे
खरे की काय कोण जाणे !

-0-0-

## आपला

बेअब्रूचे सावट दाटून आले
संशयाचे भूत मानेवर बसले
भीतीची थरार रक्तात भरली
तेव्हा वस्तुतः मी
तुम्हाला आपला वाटलो असतो
पण मी निमूट राहिलो --

फक्त म्हणत राहिलो स्वतःशी
सध्या-- जखमी व्हावेच लागते
हेच कबूल करणे फायद्याचे आहे.
तर तुम्हाला वाटले, मी शांत झालो.

मित्रांनो, दुसऱ्यांना आपला
वाटू शकण्याच्या अवस्थेत
शांतता असू शकेल का ?

तुमचा आपला
नसण्याचे बिनमहत्त्व मला कळले
असा डांगोरा पिटण्याची
घाई करू नका.

बरेच काही
मला कळत नाही.
-0-0-

### बरोबर आणि चूक

बरोबरपणाच्या शक्तीने
चूकपणाच्या कमकुवतपणाला तडा जाऊन
वेड लागणार
म्हणजे सहअस्तित्वामुळे
बरोबरपणाचाही पाया डळमळणार --
शिवाय एकमेकांबद्दच्या
थोड्याफार आपुलकीतून
दुतर्फी भयग्रस्तता विस्तारत चालणार.

बरोबर असूनही भय बाळगावे लागते.
कमकुवतपणाला सहानुभूती मिळत नाही.
म्हणून खिन्नता विस्तारत चालणार.

बरोबर आणि चूक
या मर्यादित नगण्या क्षेत्रात
प्रचंड पसरलेले हिंसेचे साम्राज्य
समक्ष पाहिले तर

तो क्षण उडवाउडवीचा नसणार ...

-0-0-

## ' गालिब ' च्या आजूबाजूच्या पण संग्रहात न आलेल्या कविता

### आयुष्य गायब

मधेच कधीतरी जाग आली.
पहिल्याच नजरेत लक्षात आलं.
आयुष्य गायब.
उशालाच घेतलं होतं. नेहमीप्रमाणे.
भांबावलो.
मग भांबावणंही नाहीसं झालं.
बाहेर पडलो. खूप अंधार होता.
दिवे गेले होते.

तसा जरा उशीराच परतलो.
तोवर रस्ते प्रकाशले होते.
पडलो पण झोप आली नाही
एकटेपणामुळं हे घडत असेल का.
आलेल्या दिव्यांनी काहीच फरक पडला नव्हता.
संगमरवरी स्वच्छ रस्ता.
वर तारा. आणि त्यांवर हिवाळी आकाश.
आणि स्वच्छ ऊन.

असं दृश्य अंधारात पाहात रात्र गेली.

सकाळी काहीतरी कारण घडलं.
आणि शेजाऱ्याशी भांडण झालं.
पुन्हा.
तुम्ही स्वतःला शहाणे समजता.
तुम्ही स्वार्थी आहात. नालायक आहात.
वेडे आहात. बदफैली आहात.
हे ऐकलं. समांतर काही ऐकवलं.
या प्रसंगानंतर मात्र आयुष्य
हाताशी आल्याचा भास झाला.
ऑफिसात गेलो.

काम केलं.
हळूहळू लक्षात आलं.
म्हणजे संध्याकाळी.
आयुष्य तसं होतंच. चालूच.
फक्त ते गायब

झाल्याची अवस्था त्यात ॲड झाली होती.
आकडेमोड संपवून घरी परतलो.

हलकट माणूस. जाताजाता वाक्य आलं.
म्हणजे ठीक आहे.
झोपताना आणखी एक लक्षात आलं.
आता मधेच कधीतरी
जाग येण्याचा प्रश्नच नाही.

-0-0-

## परंतु मी

विचाराने गुंतागुंत आणि गुंतागुंतीने विचार
असे दोन्ही अनेक दिशांनी वाढत आहेत
माझ्या पायांखालच्या वाळूत
एके काळच्या समुद्राचा नाद आहे
परंतु मी
अलगलेला.

-0-0-

## दैव

माझे सत्य मीच आहे
माझ्या हाती माझे दैव
अलगता मी जरासा
दैव छळते सदैव.

-0-0-

## धोका

खरे, आवश्यक, नैतिक आणि कायदेशीर
असे मी नामक माणसाचे विचार
उठवतात तरंग, करतात अस्थिर
सर्व कागदाकपट्यांचे कपटहीन साम्राज्य.
आम्ही जागे नव्हतो म्हणून आमचे शत्रू
जिंकू शकले -- हे वाक्य ॲबॉर्ट करण्यासाठी
सारे जग कामाला लागते.
श्रमाचे पैसे घेणारे आम्ही
प्रामाणिक कामगार आमच्या अदृश्य
मालकांचे जागे राहण्याचे सर्व हुकूम
पाळत राहतो. आमचे अपेक्षित सर्व शत्रू
कदाचित कधीच आमच्याशी
शत्रुत्व करणार नाहीत या कल्पनेनेही
मूढ होऊन दचकतात
टेबले आणि खुर्च्या.
कॅलेंडरचे पान उलटते.
धोका असतोही आणि नसतोही.

-0-0-

## स्थलकाल

प्रतिमामय अर्थांची सवय
होत होत शब्दांहूनही
गुंतागुंतीचे म्हणजेच अधिकाधिक
खोटे -- क्षुद्र होत जाते आयुष्य...
एकापाठोपाठ एक ओळींत
लयदार, तजेलदार ओवले गेलेले
अनुभवाचे रूप -- हे कोणत्या
मनाचे चित्र असते ? काय
सांगू पाहते हे मन ?

घ्या उमटवून माझा ठसा
व्हा गर्भवान वा गर्भवती

दोन मनांच्या रतिक्रीडेतून
उमलू देत अधिकाधिक नासक्या अवस्था.

असंख्य अवस्थांतरांचे अनुभव घेऊन
मन होते परिपक्व
संपूर्ण संघर्षमयताच स्थिर.

या मनाबद्दल इतर मनांत दाटतो
आदरभाव -- अन् स्थलकालाचे भान
चहूकडून घट्ट घट्ट होत
गोठून जाते.

-0-0-

## पुन्हा अशी वेळ आली

पुन्हा अशी वेळ आली
तुझा कण सापडेना
तडफडत मी गेलो
मरणाच्या दारी पुन्हा

मरणाचे दार छळ
भीती मनात गोठली
देह वाहतो वेदना
चुकचुकतात पाली

धीर मनाचा खचला
दीन झाले सारे नाद
शेवटच्या नजरेत
आला तुझा पडसाद

तूच साक्षात समोर
माझ्या अस्तित्वाचे मूळ
लगोलग नष्ट झाले
देह, नाद, पाली, छळ

तुझी अभंग पाऊले
आसमंत खुले खुले
आकाशाला दुःख नाही
सावलीत ऊन डुले.

-0-0-

## अमाप

करारे करारे
तुम्ही माझी हत्या
लावा मेणबत्त्या
प्रेतावर

दिवाळी सुखाची
शिजवा मिष्टान्ने
सारे गावगन्ने
मुक्त आता

माझा देव गेला
प्रेतासवे सती
माणसाच्या मती
सुसाटल्या

मतीनेच मेलो
अहो मायबाप
देवाशी अमाप
प्रतारलो.

-0-0-

## कावकाव

हिंसेचा त्याग, त्यागाचा स्वीकार, स्वीकाराचे दान
या तत्त्वांवर झाड चालावे असे ठरते.
ते समृध्दीच्या दिशेने जात असतात.
मात करण्याची आपली शक्ती वाढत नाही हे
त्या कावळ्यांच्या काही गटांच्या लक्षात येते.
तेव्हा ते हुकूमशाही येत असल्याचा धोषा लावतात.
तेवढे ओरडण्याचे स्वातंत्र्य त्यांना द्यावेच लागते.
ते देणे हाही एक मात करण्याचा उदार मार्ग असतो.
सत्ताधाऱ्यांना लोकशाही टिकवायची असते.

काहीच कळत नसलेले आणि झुंजण्याची
शक्तीही नसलेले दोन्ही बाजूंचे इतर कावळे
लोकशाही लोकशाही
अशी कावकाव करत राहतात.

-0-0-

## कोंबडे

करपलेल्या उल्हसित चेहऱ्यांवरच्या घर्मबिंदूंनो
तुमच्या भोळ्या प्रेमाचा वचकच तुम्हाला तारू शकेल
अन्यथा
हे सर्व सचोटीचे प्रामाणिक कोंबडे
खेळणार आहेत आता तुमच्या भविष्याशी

-0-0-

## बंदिस्त

माझे मित्र गुंगीत होते
अनुभवाच्या रेकॉर्डवर पिनेसारखे फिरत होते.
त्यांना भोवळ येत होती.
प्रेक्षकही तल्लीन झाले होते.
दिव्यांच्या अंधुक प्रकाशात
निरनिराळ्या वाद्यांसारखी
एक बंदिस्त प्रखरता होती.

-0-0-

## म्हणजे

याचा अर्थ असा की मीही मांडत होतो
स्वतःला लोकांसमोर काही तपशीलांसह
ज्यांच्या अर्थांवर माझा ताबा नाही.
संशयाचे पापपुण्य लोकांना,
मानापमानाचे मला. म्हणजे
निःसंशय मी संशयातीत नव्हतोच.

-0-0-

## अनुभवाचे बोल

माझे अनुभवाचे बोल घ्या
तुमच्या अनुभवात जमा करा
बोलाल
जे आता ते तुमच्या अनुभवाचे बोल
जे मी करून घेणार
माझ्या अनुभवात जमा
... असे आपण शहाणे होत जाऊ ...

-0-0-

## दिशा

' तळमळ अति अंतरात ' हे नाट्यगीत
एक गायिका गात असताना
चेहऱ्यावर स्मित ठेवून, मधेच ' वाहवा '
म्हणत एन्जॉय करणार श्रोतृवर्ग
ही आमच्या कलाक्षेत्राची कोणती दिशा ?

-0-0-

## घटना

एकाच घटनेचे जर वेगवेगळे परिणाम
होत असतील तर वस्तुतः
ती एकच घटना नसतेच किंवा
घटना खरी असली तरी
परिणाम खोटे असतात.
कुणाचे मन कधीच ती घटना नसते
अर्थहीन.

-0-0-

## पायाचे दगड

हजारो वर्षे नुसतेच सगळे पायाचे दगड ?
इमारत कुठे आहे ?
आपण इमारत बांधत आहोत का ?

-0-0-

## अफरातफर

मन आणि कृती यांतले अंतर
ही सततचीच अफरातफर.

काही दोषी व्यक्ती दुसऱ्या काही दोषी व्यक्तींना
दोषी ठरवतात आणि
उरलेल्या सर्व दोषी व्यक्ती
' बरे झाले ' म्हणतात
-- हीही अफरातफरच.

-0-0-

## बगळ्यांची माळ

निळ्या आभाळावर
गर्द निळ्या
राखट मेघांचे
पांढऱ्या छटांचे
खवलेखवले पडले होते.

अरुणोदयी
संथ हिरवी सृष्टी
उल्हसित पक्ष्यांना
हवेत सोडीत होती.

मुग्ध इमारती
खवल्यांच्या आभाळाखाली
उभ्या होत्या.

अनेकरंगी
थंड रस्ते
धुक्याखाली
पहुडले होते.

-- आणि
गवती पात्याच्या
हिरव्यागार टोकावर
एक पिवळे पाखरू
पुनःपुन्हा थांबत होते.

त्याच वेळी एक
बगळ्यांची माळ उडत गेली
खवल्यांखालून
शुभ्र किरणांतून
संपूर्ण अस्तित्वाला
क्षणस्पर्श करून ...

-0-0-

## सोप्पं

सगळी माणसं आपल्याच स्तराची असावी असं वाटतं.
काहीजण तशी ती आहेत असं वाटून घेतात.
काहीजण तशी ती नाहीत असं वाटून घेतात.
काहीजण चिडतात, काहीजण प्रेम करतात.
काहीजण काहीतरीच करतात. काही काहीच करत नाहीत.
तुलनात्मक स्पष्टीकरणांत मरून जातात; आयुष्यभरचे

विद्यार्थी म्हणून मिरवतात.
अशा जनांस्तव काय कुढावे
मोह कुणाचे का गुंफावे ?
असं म्हणून काहीजण वेगळेच राहतात.
म्हणजे आपण त्यांतले नाही हे वाटून घेणं सोपं.
एकूण -- सगळे सोप्पं आयुष्य जगतात.

-0-0-

**शव**

केशवाचे शव त्याच्यामधे सडत होते;
सडत कुढत धूर त्याचा अस्तित्वाला ग्रासत होता ;
उसवत टाके विखरत भान वावटळीत भिर्कत होता;
असेच, असेच.
केशवाच्या शवाने त्याचे शव वेशीवर टांगले;
केशवाचे शव कोसळून पडले.
त्याने वेस ओलांडली.
आणि दोन्ही शवांसकट वेस
नष्ट झाली.
उरला फक्त ' तो ' किंवा ' मी ' किंवा ' संपूर्ण. '

-0-0-

## निःशब्द क्रीडा : नऊ कविता

### एक

स्त्री आणि पुरुष या भेदामुळे
प्रतिक्षणी पडणाऱ्या कोट्यवधी ठिणग्या
रिसीव्ह करणारे यंत्र
सापडल्याचे कळताच आकाश लाल झाले
मानवी शरीरांच्या सर्वांत ज्वलंत
प्रक्रिया आवाक्यात आल्या होत्या

कुटुंब नियोजनासाठी याचा उपयोग करायचे ठरले
उलट प्रक्रियेच्या यंत्राने
मानवी मेंदूंना कृत्रिम ठिणग्या
पुरवण्यात येऊ लागल्या
सौंदर्य, आकर्षकता, आक्रमण इत्यादी गोष्टींचे
सहजीच उच्चाटन झाले.

सर्व मानवांना सदोदित ही ठिणगी
प्रदान करता आली तर संपूर्ण
मानवजात मुक्त होईल अशी कल्पना आली.

अंमलही झाला.
सर्व मादक द्रव्यांचे खप थांबले.

ठिणगी थांबताच आकाश निळे दिसते
असे म्हणणारा माणूस समजला जाऊ लागला
समाजशत्रू -- अन् त्याचे डोळे विकृत.
यंत्रातून होणाऱ्या उत्पादनात सामावले
गेले संपूर्ण आयुष्य
स्त्री--पुरुष झाले स्वतंत्र आणि मुक्त.
आधीच्या अनुभवातला विस्कळीतपणा गेल्याने
एकसंधता आली.

-0-0-

## दोन

अनुभव प्रतिमा मांस लयकारी
हे सर्वच ओलांडून पहावा लागतो कधी
हाडांच्या सांगाड्याला भरलेला मूलभूत ताप

मानसिक व्यग्रतेव्यतिरिक्त
अन् शब्दांतून जाणवणारही नाही कदाचित धुंद
अशी एक भेदक लय

तीच फक्त ओलांडू शकेल
आमचे ऐकीव आणि समक्ष ज्ञान
अन् आमच्या अनुभवांचे अवडंबरी माहात्म्य

हाडांचा सांगाडा असतो खडबडीत
त्याचे प्रश्न असतात त्याच्या इतकेच अंतिम
अन् मांस असते त्यांच्यापासून शतयोजने लांब.

-0-0-

## तीन

अधाण आलेल्या समुद्राचे प्रतीक
घातक ठरते हे संशोधनांती सिध्द झाले.
विशिष्ट आशयासाठी तेच प्रतीक
अटळ असल्यास त्याचे सूचक म्हणून
काचेच्या बंद घराचे प्रतीक वापरण्याची मुभा
ठेवली गेली.
फक्त ते संगीतमिश्रित नसावे असे ठरले.
कलावंत संतापले.
समुद्राचे महत्त्व न जाणणारे शास्त्र

आम्हाला नको म्हणाले.
आम्ही काचेच्या बंद घरावर दगड मारू म्हणाले.
हेही घातकच ठरले हे शास्त्रज्ञांनी सिध्द केले.
दगडाऐवजी ' दगड ' हा शब्द वापरावा अशी सूचना आली.
आता कलावंतांना त्यांचे उधाणणारे स्फोट आवरणे अशक्य झाले.
ही प्रचंड वस्तुस्थिती नाकारणे शास्त्रज्ञांनाही अशक्य झाले.
सामंजस्याची शक्यता निर्माण झाली.
तेव्हा दोघांच्या मीलनाचे प्रतीक म्हणून
एक स्मारक उभारायचे ठरले.
स्मारक म्हणून प्रतिष्ठापिण्यासाठी कलावंतांनी
' अनुभव ' नामक एक अनाकलनीय मूर्ती बनवली.
आधीच्या सर्व गोष्टी रद्द केल्या गेल्या.
मोकळेपणा आणि स्वतंत्रपणा यांचा हा एक वेगळाच
अनुभव होता.

-0-0-

## चार

उडाले एका स्फोटात
संपूर्ण मानवी इतिहास - परंपरा
स्फुरण पावत आलेल्या संस्कृतीचे घोडे
अन् दुःख आणि त्याग यांचे उदात्त पर्वत.
क्षणभर भीती वाटली.
भीतीने ठोकली बंडाची आरोळी.
या गोष्टींना कोणालाच हात लावता येणार नाही.
जिवापाड जपल्या आहेत त्या आरंभापासून.

हे बंडही जेव्हा नष्ट झाले त्याच स्फोटात
तेव्हा भीतीने टाकायचा ठरवले शेवटचा डाव.
संतापल्या असंख्य सुसंस्कृत मानवी टोळ्या --
आल्या फुसांडत शोधीत मुळातच अदृश्य त्यांचा बळी.

-0-0-

## पाच

व्यस्तता, राजकारण, डोक्यातली साठेबाजी,
त्रस्तता, मार्गासाठी धडपडणारे मन, अन्
बजबजलेली गर्दी
यांत आमचे निर्माण, पालन, विनाश.
एखादा जरी क्षण असता चेहरा शांत
तर आम्हीही खपून गेलो असतो त्रिमूर्ती.
उपयुक्तता आणि रचनांचे गंडेदोरे
बांधून आम्ही बुध्दिमान

येतो सदा एकत्र एकेकटे.
आमची सारी यंत्रे धपापती मोठी --
आमच्याहून आमच्या
डोळ्यांवरची झोप खोटी खोटी खोटी --
प्रक्षोभातच आमच्या
सुटतात थोड्या गाठी.

-0-0-

**सहा**

स्वतःचे उष्टे खाणारी
आणि दुसऱ्यांना खाऊ घालणारी
माणसे खूप आहेत.
मनुष्यस्पर्शविरहित अन्न
निर्मिण्यासाठी शब्द झिजवायचे
ठरवले तेव्हा
मित्रांनी अज्ञानाची कीव केली.
मोर झाले तरी
त्यांचीच पिसे फुलविणार -- त्या
पिसांबाहेर कुठले आले आहेत डोळे
-- असे म्हणून मित्र हसले.
अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी
हजारो वर्षे धरपडणारी
मानवजात झाली उत्स्फूर्त प्रतिसाद.
एकमेकांत मिसळले जाणे
हेच जणू प्रेम होते --
आणि या प्रेमाचा प्रत्येक डोळ्यातून
ओसंडणारा बहर
हीच जणू वर्षाऋतूची खूण होती.
प्रत्यक्षात पाऊल पडण्या न पडण्याच्या
स्वच्छ घटनेला जणू स्थानच नव्हते.
शब्द हे जणू फक्त ज्ञानाचेच माध्यम होते.

-0-0-

**सात**

उधारीमुळे समाजात न्यूनगंड आणि आधिक्यगंड
या विकृती फैलावतात
हे लक्षात येताच धुरीणांनी चंग बांधला.
उधारी हा हक्क असून -- असून न देणाऱ्याला
जबर शिक्षेची योजना करण्यात आली.
परंतु यामुळे धुरीणांत आधिक्यगंड
आणि जनतेत न्यूनगंड फैलावू लागला.

त्यामुळे हक्क आणि शिक्षा या गोष्टी
काढून स्वेच्छेचा प्रचार करायचे ठरले.
अर्थात यामुळे धुरीणांना टीकेला
तोंड द्यावे लागले. त्यांच्या धरसोड
धोरणाने जनतेची अपरिमित हानी
होते असा प्रचार सुरू झाला.
स्वेच्छेचा प्रचारही त्यापुढे फिका पडूं लागला.
यातून धुरीणत्व कुणाकडे असावे
हे एक नवेच पिल्लू निघाले आणि
ते वाढू लागले.
न्यूनगंड आणि आधिक्यगंड परवडला
पण हा आक्रमणगंड नको असे झाले.
सैन्याला तयार राहण्याचे आदेश गेले.
परदेशांच्या आक्रमणांचा धोका वाढू लागला.
अफवांवर विश्वास ठेवू नका असे सांगण्यात आले.
सर्वांच्याच प्रामाणिक प्रयत्नांतून समाजाची
एक नवीन घडी बसू लागली.

-0-0-

**आठ**

पाहिला आहे मी एक राजा
सोडून देणारा स्वेच्छेने राज्य
आधिपत्य आणि सर्व मरातब

तो जाताच
उजेडात आले आहे सत्य --
-- राजा होता अगदीच अनावश्यक
तकलुपी तात्कालिक आणि
खोटा
आणि भोगत होता तरीही विनाकारणच तो
राज्याच्या जबाबदाऱ्यांची बरीवाईट ओझी

तो गेल्यानंतरचे त्याचे राज्य
आता संपूर्ण मृत वा जिवंत
आणि त्याच्याशी असंबधित

आश्चर्य हे की हा ना खोट्याचा पराभव
ना सत्याचा विजय

-0-0-

## नऊ

शब्दांना झाला जेव्हा
निःशब्दतेचा स्पर्श
तेव्हा फुलले
कळ्यांचे वर्ष.
शब्द झाले गंधसुदर.
ओसरण्यातच बहरले अंबर.
शब्दक्रीडा झाल्या
निःशब्दक्रीडा
मनाची सारी
टळली पीडा.
मन झाले श्वासोच्छवास
प्राण झाला निखळ सुवास.
शब्दांच्या रात्रीत
उगवले निःशब्द
माझ्यातून झाले
शब्द स्तब्ध.
स्तब्ध कळ्या
अशा मोकळ्या
कौमार्य फेडून
सोनसळ्या

-0-0-

## मोल

उचंबळून आलेल्या भावनांनी
कवटाळू शकलो नाही काहीच ...
... मी जळून गेलो आहे की
सर्व दुःखांना सामोरा होण्यासाठी माझ्या
सर्व प्रतिक्रियांचे मोलच मी फेकून दिले आहे...

-0-0-

## वेग

वेगाला वेगळे
संपर्क लागत नाहीत

वेग हीच एक भाषा असते
लवचिक, धगधगती किंवा कशीही
जिचा  डोळा ठरत नाही कुठेच

वेगच एकेक सार्थक

वेगांशी घर्षण्यातच जाग

ग

भाषा नष्ट होण्याची भीतीच
वेग.

-0-0-

**इतस्ततः**

की गोंधळात सापडल्यावर इतस्ततः
पडलेल्या टरफलांसारखे प्रश्नच
प्रश्नांतून पळण्याचे मार्ग होतात ?

-०-०-

## तोवर

पार्थिव देहाच्या भावनांवर व्ययकर बसवला
तरी वर्णव्देषाचं काय होणार ?
दृष्टिकोणांचे कर दृष्टिकोणांनीच भरावे लागतात
तोवर हे असंच -- आपादमस्तक --

-0-0-

**प्रयत्न**

छातीतले प्रसंगांचे दडपण
निवारण्याचा माझा प्रयत्न
करतो सारेच अधिकच तीव्र
म्हणजे
माझे आयुष्य
ही एक निव्वळ कल्पनाच तर ...

-0-0-

**अटळ**

सावज बेसावज
हीच एक शक्य अवस्था
अटळ...

-0-0-

## शब्द

राचनिक कांती, अर्थप्रदान वा निरर्थप्रदान समारंभ
जळत जाणाऱ्या सुंभाहून जास्त पीळ -- आमचा पिंड -- असं काही
संज्ञाशीलता, प्रखर जाण, मखर त्यावर अशी क्षमता
अभिव्यक्तीची -- असंख्य व्यक्तींहून काही वेगळं, काही जास्त
-- इतरांचे जीवन, मन, पर्सनॅलिटी ज्यामुळे रिच होतात ते
ब्रीच न करता शब्द -- करिअर -- फिकिर -- बेफिकीर ...
-0-0-

## वारा

भूवस्त्राचा थर उचलतो वारा
आणि
कल्लोळते एकच
व्दिमन.
-0-0-

## खूप

खूप गोंगाट ... खूप ...
झांजा वाजवीत मने उभी...
वातावरण भरलेले ... भारलेले ...
बेंबीच्या देठापासून मंत्रमुग्धता ...
झिंग ... अधीर ... बधीर... खूप ...

-0-0-

## विश्वास

एका सकाळी उठताच
व्याकरण हरवलेलं --
एक अस्ताव्यस्त आवाजांचा प्रचंड हत्ती
नुसता --
असं होणार नाही
या विश्वासावर लिहितोय मी कविता ...

-0-0-

## बंदिस्त

एकाच घटनेचे जर वेगवेगळे परिणाम
होत असतील तर
वस्तुतः ती एकच घटना नसतेच किंवा
घटना खरी असली तरी परिणाम खोटे असतात.

कुणाचेच मन कधीच ती घटना नसते
अर्थहीन.

कुणी मित्र गुंगीत असतात.
अनुभवाच्या रेकॉर्डवर पिनेसारखे फिरत असतात.

त्यांना भोवळ येत असते.
प्रेक्षकही तल्लीन झालेले असतात.
दिव्यांच्या अंधुक प्रकाशात
निरनिराळ्या वाद्यांसारखी
एक बंदिस्त प्रखरता असते.

-- हेच स्वातंत्र्य !

-0-0-

## बडे गुलाम अली खाँ

अस्तित्व भरून दऱ्या कडे
एक तपःपूत मवाळ ताटस्थ्य
एक दिलदार बेदरकार सादगी ...
असाध्य अरण्यातून
गहन पावले टाकीत फिरता नाद...
काळाहून प्राचीन
एक गंभीर प्रतिसाद ...
-0-0-

## बालगंधर्व

एक नवनीत तेज :
पुंज तारकांचा
आकाशस्थ पती
एका अलगद दुनियेचा ...
-0-0-

## अब्दुल करीम खाँ

तिरपी सरळ तिरपी
धार पावसाची
एका निराधार प्रेयसीची
समुद्राला हाक ...
डोळ्यांपुढील वेली बाजूला सारून
दृष्टीहूनही दूर पाहणारे डोळे
निश्चल ...
.-0-0-

## ओंकारनाथ ठाकूर

मृत्यूला भिडलेलं एक अवाढव्य अस्तित्व
सहजीच वाहून नेणारा एक योगी
मधेच थांबायलाही न भिणारा
एक अनौपचारिक स्वयंसिध्द ...
खूप दूरवरून भरून
आलेला एक सांज मेघ
बरसता ... रानांवर ...

-0-0-

## गगन

गगन -- एक उत्ता पहारा
नगा

गगन -- एक स्वयं सदेह
खगा

-0-0-

## शीर

सराईत भाळावर अचानक
उमटली एक सणसणीत शीर
लांगूलचालन शेपटी
नुक्तीच तुटून पडल्यासारखी ...

-0-0-

## मर्त्य

शुभ्र मांजरी फुलार धाक
गुब हलकेसे भय
मौ वाटेवर हिरवळ दाट
उभव किनारी लय

मुजोर हेकट भरती भोर
लव थरे मनावर लाटा
लाल कोवळे नखाग्र भोळे
मर्त्य क्षणावर रट्टा !

-0-0-

## ओल

माझ्या निष्पर्ण वृक्षात ही ओल संचरते
सबंध जग अप्रस्तुत होतं
एका घनगर्द भावनेत डोळे वाळतात
शरीरभर फुटलेलं स्पर्शाचं वारूळ
हिरव्या हिरव्या भरानं सरसरत राहतं ...
वाळूवर पडल्यासारखा तिच्या विश्वात
मी आकाशाकडे पाहात पडून राहतो ...

-0-0-

## सफर

भाषा शिकताना विसरू नका
स्वतःची पावलं आणि युध्दांचे धूर
येताजाताना मधूनमधून घ्या उकरून
तुम्हाला पडणाऱ्या प्रश्नांची अस्तित्वं

यापलीकडं काय करणार ?
कळूनसुध्दा अस्तित्वाच्या मर्यादा
जगायचंच आहे ना
अंधाराला सरावत ?

म्हणून फक्त शेकून घ्या इंद्रियं
बांधा काठीला सोनं आणि
त्वरेनं निघा सफरीवर
स्वतःच्या स्वतःतून आणि स्वतःकडे ...

-0-0-

## जुने

आला गेला दिन । प्रसंगांचे रण ।
विचारांचे घण । तसे जुने ।।
आधाराला शीण । उधारीला जन ।
उपाशाचे मन । नेहमीचे ।।
इच्छेला सोपान । देवाला ही आण ।
असो द्यावी शान । मानेला या ।।
युगानुयुगे मी । चालतोच आहे ।
सावरीत की हे । प्रेत जुने ।।

-0-0-

## संध्याकाळ

संध्याकाळ.
जाड बुंध्याच्या धुकट झाडाची
कुबट काळ्या जमिनीवर सावली
पडलेली.
जवळच त्याच ओलीत
मांजराचं आजारी मुटकुळं
झडलेलं.
मन दाट तवंगासारखं
डोळ्यांतल्या.
जातायेता आठवणाऱ्या कातरवेळा --
बुंध्याच्या आजारी सुरकुत्यांवर
खोल आणि वरवर.
-0-0-

## पडद्यावर

अंधाराचा पडदा
त्यावर हलक्याशा सावल्या
परावर्तन चमक एक क्षेप
हळूहळू फेडत जातात
विस्फारत अंतर्भाग
गर बिया समूह
समूद्र
उसळतात उत्तुंग लाटांचे
दिवाभीत आवाज
वाजत गाजत त्यांचे सत्य
मुसमुसते संस्कार
उसळतात
पडद्यावर अननुभवी
पडत्या पांढऱ्याफेक
-0-0-

## पक्षी

छातीत एक सुरळीत कोठार
तरळत येतो अंधारातून
कुठूनतरी एक भयाण पक्षी

फुटते कोठार
एक दाणा घेऊन जातो
पुन्हा एक धडक
एक दाणा घेऊन जातो
विखुरते कोठार
जिवंत देह असहाय

... एकेक दाणा
घेऊन जातो
मोहर सावकाश झडत जातो
एकेक टाका सुटत जातो
मरणाकडे झुकत जातो

पक्षी -- अंधाराचाच एक आकार
मऊ स्पंदनावर संथ वेगळाच
रोवणारा तटस्थ पाय ...

-0-0-

## एकाच वेळी

प्रेम आणि भय
एकाच वेळी -- कवितेबद्दल
कारण ती आहे
एक स्पष्ट कळणारं गूढ ...

-0-0-

## अश्रू

मी एकटा आहे
असं जेव्हा मला दिसतं
तेव्हा सगळी दुकटी माणसं
माझ्यातून निघून गेलेली असतात
मी एका पोकळीतल्या पाकोळीसारखा
अंधपणे भिरभिरू लागतो
आणि गेलेल्यांची माया
माझ्या चेहऱ्यावर उतरते
माझ्या भीतीत मिसळत

क्रिया शुध्द राहाव्या
दुखणी नाहीशी व्हावी
असा मी प्रयत्नशील असूनही
सारे तसेच राहते कारण
माझा एकटेपणा
मला दुकटं होऊ देत नाही
-- मला मीच राहावं लागतं

जेव्हा मला माझा दुबळेपणा जाणवतो
तेव्हा मी होतो एक अटळ संघर्ष
मग होतो एक अश्रू

गोठून शून्य झालेला

मला शांतता हवी आहे ...
असं म्हणण्याइतपतच
असतो मी जिवंत ...

-0-0-

## मोड

अंजारीत हसलो
गोंजारीत फसलो
तरी चालण्यासारखं आहे

मी म्हणजे फक्त मोडकळीला येण्यासाठीच
जन्माला आलोय की काय
मोडीतलं सामान घेणारा बिडी पीत
बसला होता तारवट
म्हटलं
जा घेऊन मलाच

त्याच्या तोंडातला सगळा धूर
भपकन् माझ्यावर आला -
ठसका लागून हसत राहिला तो
डोळ्यांतून पाणी येईपर्यंत
मी गुदमरून गेलो

मलाही तांबडे ठणठणीत डोळे हवे होते ...

-0-0-

## बारीक

पानं, रुपेरी चंद्र, स्वच्छ अंधार
मी हिरवा, मी रुपेरी, मी लाल
माझ्या जखमेवरचा डिंक वितळतोय
छपरांवरुन, वृक्षांतून, बोळांतून
फटीफटीतून वाहतोय मी
मऊ आभाळात ... गोठून
काळं पडायचं नाहीय मला ...

डिंकाजवळ एक बारीक फुलपाखरू
आठवणीगत बसलंय ...

-0-0-

## नर्तकी

नसलेले अवयवही असल्यासारखे नर्तन. पाय गेला
तासून वा तुटला हात -- नर्तन सतत बेहोष.
जिवणीतलं स्मित तसंच अस्फुट. उभार नितंब
तसेच मग्न. अलंकृत न्यास तसाच -- तसेच
अविचल चैतन्य. सबोल बांधा. सखोल नजर.
पत्थर केवळ संपूर्णच. निंच नर्तकी
लवती कटी. नसून असणे असे समोर.
असून नसणे असला मोर. घन घनघोर.
हिंस्त्र कठोर.  ना स्थळ ना काळ.
निंच नर्तकी सर्व स-काळ.

-0-0-

## लक्षण

मी बेशुध्द कधी झालो ते आता आठवत नाही.
शुध्दीवर आल्यावर खूप अशक्तपणा जाणवतो आहे.
माणसांशी मी काही ना काही बोलतो पण ती
म्हणतात -- मी त्यांना ओळखत नाही...
... खरेही असेल ! कसलीच खात्री नाही आता.
माझे शुध्दीवर येणे
माझा आत्महत्येचा प्रयत्न फसल्याचेच लक्षण
मानताहेत सगळे ...
मलाच सत्य माहीत आहे ...

-0-0-

## कायद्याचे राज्य

विद्युतवेगाने घटना घडल्या आणि
राज्य बदलले. " कायद्याचे राज्य आले "
-- घोषणा झाली --
" कायद्याचे राज्य आले ! "
रस्त्यांवरुन धावपळ झाली.
माणसांची गर्दी इकडे होत राहिली,
तिकडे होत राहिली.
" कायद्याचे राज्य आले ! "

घरे, ऑफिसेस, दुकाने उघडली.
नव्या दिवसाचे ऊन स्वच्छ वाटले.
वडाच्या पारंब्याही वेगळ्याच दिसू लागल्या.
एका अंधाऱ्या खोलीत एकाकी बसलेल्या
एका माणसालाही जाणवले,

" बहुतेक, कायद्याचे राज्य आले ! "

नंतर कुणीतरी कायदा कसा असावा
असा एक भुक्कड विषय चर्चेला काढला.
तेव्हा कुठे गर्दी पांगली.
यातून वाद निर्माण झाले तर त्या वेळी
यालात्याला आपण पाठिंबा देऊ
असे ठरवून मंडळी उद्योगाला गेली.
या वादातून कायदा आणि सुव्यवस्था
मोडली जाऊ नये याची दक्षताही
घेतली जाणे आवश्यक होते.
कारण आता कायद्याचे राज्य आलेले होते ...

-0-0-

## दंगली

दंगली चिघळल्या.
मार्गाची निवड अशक्य झाली.
निवड लांबणीवर टाकणेही धोक्याचे झाले.

प्रत्येक चौकात पहारे बसवले.
सर्व पथके तयार ठेवली.
दारूगोळ्याचा जय्यत साठा आणला.

आता स्वतंत्रपणे विचारविमर्ष करून
सर्वांनुमते निर्णय घेण्याचे ठरले.

बाहेर -- विचारापेक्षा प्राणांची बाजी
लावण्याची प्रखर तत्त्वनिष्ठ परिस्थिती होती.
त्यामुळे विचाराने निर्णय घेणे अशक्यच होते.

परिस्थिती बदलेपर्यंत विचारविमर्ष
करत राहण्याचे ठरले.
निर्णय नाही तर नाही. निदान
विचारस्वातंत्र्य आणि व्यक्तिप्रतिष्ठा
तरी प्रस्थापित करत राहावे
असे ठरले.

दंगलखोरांना
हे काही नवीन नव्हते.

-0-0-

## नेते

त्यांना सत्तेची अभिलाषा नव्हती
अत्याचारांची त्यांना चीड होती
एरवी कुठल्याही आश्रमात
ते शांतपणे जगून संपले असते.

त्यांच्यात संघर्ष नव्हते,
कुणाचे कुणावर वर्चस्व नव्हते,
आपलेच खरेखोटे चिवडत बसून
काळाचा अपव्यय करणे त्यांना मान्य नव्हते.

त्यांचे नेतृत्व नामधारी होते.
केवळ एक गरज होते.
वस्तुतः सगळेच नेते होते.
कमीजास्त प्रभाव नव्हतेच त्यांच्यात.

नेतेपणातही त्यांना अपराधीपणा वाटे.
काय म्हणून बाकीचे नुसतेच अनुयायी ?
केवळ एक रचनेची गरज
एवढाच या गोष्टींना अर्थ होता.

हे इतके खरे होते की याबद्दल
संशयही येऊ नये. कुणालाच.

-0-0-

## ही फक्त

ही फक्त एक नवी नव
लाई आणखी केव्हाही कशीही

जागा -- वास दरवळ वणवण
ऊन्ह सुखकारक सायकलींची चाकं
असंख्य फिरत्यांतून पार दूर
लहान खोली -- कॉट कोइन्सिडन्स
हवी होय ती ना ही --
आहे पाणीही प्रचंड मैदान वाह
अंधार रस्ता डोंगर ढीग
शहर दूर टिम् टिम् टिम्
मार्ग छोटे देव स्टॉप माती नाद
वाहनी निरर्थ स्थान माणूस बैठी
बैठक मोजक जवळ परत डॉक्टर जय
देखो यहॉसे बंबईका कारवॉं
बंदरगाह पांढरं बटण दिवा गार

वा अशा उतार पाय
ऱ्या फिरत टिम् टिम्
सतार झणत् कार वसाहत जुने सूर
ज्यांची सरती याद अशी माणसं
नवर लेली नशी नलाई
अशी भुलाई कशी नवेली
अशी वाकती ही तर माया
दोन दिसांची सरती काया

या मोहरत्या जगात हलते पान समोर
होऊन काळ ...

-0-0-

## नैतिक

**-- चं. प्र.देशपांडे**

**अ** म्हणाला बला मी नैतिक, तू नैतिक --
आपण दोघे मिळून नैतिक.
साधे राहू, गरीब राहू,
घाम गाळण्याचे गीत गाऊ.
मतभेद हुशार थोडे थोडे
बाळगत राहू भाऊ भाऊ.
शबनम पिशवी, पांढरे केस,
कष्टाचे शरीर ( पण उर्मट फेस ),
साधाच आपला मळकट ड्रेस.
इतरांनाही शक्यतो सामावून घेऊ.
जात नको, धर्म नको,
कर्मकांड तर नकोच नको.
घामाचे गोडवे गात फिरू,
साधे राहू, गरीबांचे वाली
आपणच होऊ ... विचारसरणी घट्ट ठेवू...

**नै**तिक म्हणजे नैतिक विचार --
विज्ञानसंमत आणि गरीबवादी.
तसाच असावा आपला आचार --
प्रामाणिक आणि इहवादी.

**स**त्ता नको, संपत्ती नको --
काबाडकष्ट करत राहू --
शारीरिक, मानसिक --
नैतिक राहू ...
गोड बोलण्याचा त्रास नको,
वाटाघाटी नकोत, वाद नको,
कलेतसुध्दा ' डोक्याला ताप नको ' !
थोडे काम, विनोदी करमणूक,
थोडी तत्त्वज्ञानाची हळवी डूब
( थंडीत जशी असते
शेकोटीला ऊब ) .
तत्त्वज्ञान म्हणजे जुन्याचा --
विशेषतः नैतिकतेचा -- गौरव हो !
नैतिक राहू ...
( हेच तर इथले पिढ्या घडवणारे,
काही तर तुरुंगाची तयारी ठेवणारे --
शहाणपणासाठी -- परिपक्वतेसाठी नव्हे --
तत्त्वाच्या अभिनिवेशासाठी
प्राण कुर्बान करणारे,
आदर्शांना उंच धरणारे,
आपली अलगता पक्की करणारे ... )

**मो**ठमोठ्या योजना, निर्णयांचे धोके,
आवाका आणि अंमलबजावणी --
ही तर सर्व स्वार्थी, दुष्ट,
पिळवणूक करणाऱ्यांची करणी.
उन्हात राबत कष्ट करणारे श्रेष्ठ --
एसीत बसून काम करणारे दुष्ट.
( बाळकडू कडू असले तरी हेच इष्ट ! )
-- दुसरे गुंड, दुसरे आक्रमक --
आपण राहू पापभीरू, जपणारे बाणे,
साधेभोळे ( पण वैचारिक मग्रूर -- )
अपयशाने काहीसे उदासवाणे --
तरीही आहे एका आवाजात गाणे...

**भू**मिका म्हणजे पुरोगामी हो !
तिचा आग्रह आणि विचारस्वातंत्र्य,
कलेसाठी अभिव्यक्तीस्वातंत्र्य --
आग्रह धरावा, जोपासावा, घ्यावा
गरीबांचा कैवार, दुर्लक्षावे
जगण्यातले अंतर्विरोध,
सुखदुःखांच्या अतर्क्य रचना,
गुंतागुंत, हपापलेपण --
( आणि हो, न - कळणेपण -- )
म्हणावे जोरात -- भूमिका घ्या,
बाजू घ्या, बोला, भांडा,
विरोध करा, विद्रोही व्हा --
बांधिलकी हवी -- सुधारकपणा हवा,
माती हवी इथली --
( यांशिवाय मूल्ये असतात तरी कुठली ?
-- हे सगळे असूनही कला इथली
' बरे '- ' ठीक ' च्या मर्यादेतच का कुथली ? )
( भूमिका -- जगण्यातला एक छोटा ठाव
-- हे विसरण्यातच तर
दहशतवादाचा शिरकाव ...
भूमिका धारण करणारे मनच असते
अंतर्विरोधात तडफडते --
कसे असेल ते समता -- शांततेचे भोक्ते ? )

**अ** म्हणाला आत्मपरीक्षण करत थोडे जागू.
ब म्हणला नंतर लगेच सवयीचा त्याग भोगू.
हिंसेला म्हणू आपध्दर्म,
लहानसहान सोडाच -- मोठमोठ्याही
तडजोडींना म्हणू हितैषी कर्म.
( वर्मांवर दुसऱ्यांच्या ठेवत बोटे
प्रामाणिकपणे दमू नि भागू. )

( **वि**चारसरणी सगळ्या  बोंबलल्या तरीही
विचारसरणीच बोंबलत राहू ...
तीच री ओढत राहू ...)

**रो**जीरोटीचे प्रश्न, सामाजिक न्याय --
यांशिवाय किंवा यांचे मूळही  नये पाहू --
एकेक प्रश्न स्वतंत्रपणे
पिसत पिसत पिसत राहू ...

**स**माजकार्य करणारेच फक्त निस्पृह,
त्यागी, सत्यवादी, ध्येयनिष्ठ आणि मोठे --
बाकी सगळे स्वार्थाने बरबटलेले छोटे --
यांच्यामुळेच जग इतके खोटे खोटे खोटे ...

( **क**शी होणार मुले कर्तृत्ववान --
कशी होणार कला परिपक्व --
बाळबोध तत्त्वशीलपणातच जेव्हा
संपतेय आपले सगळे सत्त्व ? )

**ब** म्हणाला खरे तर
जगणेच मला काही समजत नाही --
अ म्हणाला बावळटपणात
जन्म गेला -- हरकत नाही --
-- यालाच आता शहाणपणा
म्हणत राहू ... नैतिक राहू ...
नैतिक राहण्यातच नैतिकता असते
म्हणून फक्त नैतिकच राहू ...
नैतिक राहू... नैतिक राहू...

**-o-o-** ( ०९ मे २००३ )

चं. प्र. देशपांडे
३, स्नेहदीप अपा. चिंतामणीनगर,
सहकारनगर नं.२, पर्वती,
पुणे ४११००९.

टेलिफोन -- ४२२७८४७.